

# मूलभूत धर्मप्रचार आणि शिष्यत्त्व

## नेतृत्त्व करणा—यांसाठी नियमावली

# मूलभूत धर्मप्रचार आणि शिष्यत्त्व

## प्रस्तावना

तुमच्या जीवनासाठी परमेश्वराकडे एक अद्‌भुत योजना आहे. तुम्ही परमेश्वराचा उद्देश पूर्ण करता की नाही, यावरच तुमच्या जीवनाची सफलता अवलंबून आहे. परमेश्वराची योजना माहिती करून, आम्हाला अन्य लोकांबरोबर येशूसाठी प्रत्येक दिवस कसे जगावे हे शिकावे लागेल. याबाबत तुम्हाला साहाय्य व्हावे, म्हणून या अभ्यासाची रचना केली आहे. तुमच्या जगण्याची पद्धत एक साक्ष कशी बनेल ? सुवार्ता कशी सांगावी ? व्यक्तिगत साक्ष कशी लिहावी ? पवित्र शास्त्राच्या सिद्धान्तावर आधारित प्रचार, प्रचाराची पद्धत आणि नवीन विश्वासणा—यांना शिष्यत्त्व शिकवणे, ह्या सर्व बाबी तुम्ही या अभ्यासाद्वारे शिकणार आहात.

प्रत्येक प्रकरणाची सुरूवात प्रार्थनेने करा. सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्या स्वत:च्याच शब्दात लिहा. यात दिलेल्या रेखाचित्रांचे मनन करून ते लक्षात ठेवा. तुम्ही जे शिकत आहात त्याप्रमाणे तुम्हाला जगण्यास परमेश्वराने मदत करावी, अशी प्रार्थना करा.

# आधारभूत
# सुवार्ता प्रचार
# तसेच
# शिष्यत्व
# नेतृत्वासाठी नियमावली

<u>**नेतृत्व**</u> : विद्यार्थ्याला प्रत्येक विषय समजला पाहिजे, याचा निश्चय करा. त्याच्या प्रत्येक रुपरेषांवर लक्ष ठेवा.

<u>**शिक्षणाचे विषय**</u> : परमेश्वराने विद्यार्थ्यासाठी सुवार्ता प्रचाराची जी सेवा ठेवली आहे, त्यासाठी समर्पित जीवन म्हणजे काय हे त्यांना समजावे, हा या पाठाचा उद्देश आहे.

<u>**या प्रकरणाचा उद्देश**</u> : तुम्ही असे व्यक्ती व्हावे ज्यांच्याकडे येशू ख्रिस्ताचा संदेश आहे. येशू ख्रिस्तासाठी जगावे व त्याच्याविषयी अन्य लोकांना माहिति द्यावी. त्याचप्रमाणे येशूकरिता कसे जगता येईल याचे शिक्षण देणे, हा मुख्य उद्देश आहे.

<u>**सुवार्ता प्रचाराचा उद्देश**</u> : येशू ख्रिस्ताबरोबर संबंध स्थापित होऊन, त्यांचा परमेश्वराने उद्धार करावा, त्यासाठी सुवार्ता सांगणे आवश्यक आहे.

<u>**प्रकार**</u> : मैत्रीद्वारे सुवार्ता प्रचार, प्रत्येक घरी जाऊन, रस्त्यावर उभे राहून, हस्तपत्रके वाटून अशा विविध प्रकारे सुवार्ता प्रचार करता येतो.

<u>**प्रथम पायरी**</u> : तयार व्हा –

१ तुम्ही असे व्यक्ती व्हा ज्याच्याकडे येशुचा संदेश आहे (एक शिष्य / किंवा साक्ष देणारे)

२ व्यक्तिगत व सांस्कृतिक दृष्टीने ज्या गोष्टी परमेश्वराच्या कार्यासाठी अडखळण ठरतात, अशा गोष्टीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करा. जीवनातील प्रत्येक दिवस येशुकरिता व्यतीत करा.

स्वत:ला नियमबद्ध ठेवा, वेळेचा सदुपयोग करा, वेळ वाया घालवू नका. परमेश्वराच्या माध्यमातून या गोष्टींची प्रतिष्ठापना करा.




ख) येशू ख्रिस्तासंबंधी माहीत करून घेण्यासाठी रोज वचनांचा अभ्यास करा. वचन वाचण्यात आपला वेळ घालवा. (उद्धार प्राप्त झालेले, पवित्र आत्म्याने परिपूर्ण असलेले, चिरकाल जीवन जगण्यासाठी पाचारण केलेले)

१. इफिस ३:४ — हे वाचा.
२. २ तीमथी २:१५ — याचा अभ्यास करा.
३. स्तोत्रसंहिता — १ — यावर मनन करा.
४. स्तोत्रसंहिता ११९:११ — याचे स्मरण ठेवा.
५. हबक्कुक २:२ — हे लिहा.
६. रोम ६:१७ — १८ — याप्रमाणे जगा.
७. १ योहान १:१ — ३ — हे सांगत राहा.

ग) प्रार्थना करा, प्रत्येक दिवशी या विषयावर परमेश्वराबरोबर संवाद साधा.

१. तुमच्या गरजांविषयी
२. तुमच्या जवळपास असलेले जे हरवले आहेत त्याच्यासाठी व त्यांच्या गरजांसाठी.
३. आपल्यासोबत असलेल्या विश्वासू लोकांच्या गरजांसाठी
४. तुम्हाला ज्या लोकांपर्यंत जायचे आहे, त्या लोकांसाठी

<u>**लक्ष ठेवा**</u> : आम्ही आमचे आत्मिक दैनंदिन जीवन योग्यप्रकारे ठेवल्यास, पवित्र शास्त्राच्या अभ्यासाबरोबरच आम्ही आमचे वाचन प्रभावी करू शकतो. (परिशिष्ट ‘क’ पहा.)

ग. येशू ख्रिस्तासाठी जगणा—या अन्य विश्वासू लोकांबरोबर रोज संपर्क ठेवा, त्यांच्याबरोबर वेळ घालवा, गाणे गा, वचनांचा अभ्यास करा व एकमेकांबरोबर आदान—प्रदान करा.

घ. ज्या लोकांना तुम्ही रोज भेटत असता त्यांच्याबरोबर येशू ख्रिस्ताविषयी बोला व त्याच्यासाठी कसे जगता येईल याचा शोध घेण्याचा प्रयत्न करा.

३. सुवार्ता प्रचाराच्या वेगवेगळ्या प्रकारांविषयी तसेच हस्तपत्रके, पवित्र शास्त्र, व्यक्तिगत साक्ष व सुवार्ता प्रस्तुतीकरणाचा अभ्यास करा.

१. योग्य प्रकारे निर्णय घ्या.

**मैत्रीद्वारे सुवार्ता प्रचार :**

**उद्देश** : लोकांना सुवार्ता सांगणे.
**पद्धत** : (प्रकरण ६ पाहणे)
**नियम** : (प्रकरण ७ पाहणे)

**प्रत्येक घरी सुवार्ता — उद्देश** : सुवार्ता प्रत्येक घरात प्रत्येक क्षेत्रात सांगणे, मंडळीत येणा—या नवीन लोकांसाठी पाठपुरावा करणे
**पद्धत** : (प्रकरण ७ पहा)
**नियम** : (प्रकरण ७ पहा)

**रस्त्यावरील सेवा :**
**उद्देश** : एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील किंवा अनेक लोकांना सुवार्ता प्रचाराने ओतप्रोत करणे.
**पद्धत** : (प्रकरण २ पहा)
**नियम** : (प्रकरण २ पहा)

**करुणापूर्ण सेवा :**
**उद्देश** : शारीरिक, मानसिक आणि भावनिक यासारख्या गोष्टींची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी सुवार्ता प्रचाराद्वारे संधी प्रदान करणे.
**पद्धत** : (व्यावहारिक सेवा अभ्यास पहा)
**नियम** : (व्यावहारिक सेवा अभ्यास पहा)

**संगठीत सुवार्ता प्रचार — उद्देश** : सुवार्ता प्रचारासाठी लोकांना एकत्रित करणे.
**पद्धत** : (विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता)
**नियम** : (विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता)

२. (दोन किंवा त्यापेक्षा जास्त) समूह संगठीत करा. या संगठीत समुहातील प्रत्येकजण प्रशिक्षित आहे की नाही याची खात्री करा.

३. तुमच्याजवळ सर्व आवश्यक वस्तू, हस्तपत्रिका पवित्र शास्त्र, संबंधित विषयांवरील पुस्तके व इतर साधने आहेत याची खात्री करून घ्या.

४. आपले कपडे (पेहराव) योग्य प्रकारचे असले पाहिजे.

ग. आपल्या मार्गावर निघा.

१. दिलेल्या पद्धती व नियमानुसार योजना कार्यान्वित करा.
२. विश्वासात दृढ रहा.

**आधारभूत प्रश्न**
विद्यार्थी जे शिकले त्याप्रमाणे त्याचे लागुकरण करण्यात मदत करा.

१. स्त्री किंवा पुरूष या नात्याने येशू ख्रिस्ताच्या संदेशाप्रत तुम्ही समर्पित आहात का ? होय..... नाही...... जर नाही, तर आजच आपले समर्पण करा.
२. परमेश्वराने त्याच्या इच्छेप्रमाणे तुम्हाला घडवावे यासाठी तुम्ही रोज त्याच्या क्रुसासंबंधी विचार करता का ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासून असे करण्यास सुरूवात करा.
३. येशू ख्रिस्ताचा प्रचार अधिक प्रभावीपणे करता यावा यासाठी तुम्ही शिक्षण घेण्याची इच्छा बाळगता का ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासून असे करण्याचा निश्चय करा.

**व्यावहारिक स्वरूपात लागू करा :—** येशू ख्रिस्ताचा संदेश देता येईल, असे स्वत:ला तयार करा.

परिशिष्ट ‘ख’ मध्ये दिलेल्या प्रार्थनासुचीला पहा.
परिशिष्ट ‘क’ मध्ये दिलेल्या निर्देशतत्त्वाचा उपयोग करून आपले दैनंदिन आत्मिक जीवन जगणे सुरू करा.

# आधारभूत सुवार्ता प्रचार तसेच शिष्यत्व
# प्रकरण २ रे
# सुवार्ता प्रस्तुतीकरण

**<u>नेतृत्व</u>** : विद्यार्थ्याला प्रत्येक विषय समजला पाहिजे याची खात्री करून त्याच्या प्रत्येक रुपरेषांवर लक्ष द्या.

**<u>शिक्षणाचे विषय</u>** : सुवार्ता संदेशाचा मुख्य विषय समजण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत व्हावी व इतर लोकांसमोर प्रभावीपणे सुवार्ता सांगता यावी, हा या अभ्यासाचा मुख्य विषय आहे.

**<u>परिचय :</u>** अनेकवेळा आपण सुवार्तेचे प्रस्तुतीकरण अर्धवट मनाने करतो, (केवळ हीच प्रार्थना करा आणि तुम्ही स्वर्गात जाल.) आणि परिणाम देखील अर्धवट होतो. आम्हाला जर खरोखरच ह्या जगाला बदलायचे असेल, तर आम्हाला बाप्तिस्मा देणा—या योहानाप्रमाणे सुवार्ता सांगावी लागेल. येशू पेत्र, पौल यांच्याप्रमाणे प्रचार करायला पाहिजे. येशू ख्रिस्तावर विश्वास आणि परमेश्वराप्रती पश्चाताप, (प्रे. कृत्ये. २०,२१) हे सुवार्ता प्रस्तुतीकरणाचे असे साधन आहे, की ज्यामुळे तुम्हाला मदत मिळेल. सुवार्ता प्रचाराच्या संदेशाला प्रस्तुत करण्यापूर्वी आम्हाला हे काय आहे, हे समजून घेणे आवश्यक आहे. सुवार्ता प्रचाराच्या संदेशात चार प्रमुख बाबींचा समावेश असतो.

१. मानवाची मुख्य समस्या पाप आहे. (यशया ५३:६, रोम ३:२३)

२. या पापामुळे आम्ही वेगळे पडलो आहोत. (यशया ५३:६, रोम ३:२३)

३. प्रभू येशुने आमच्यावर इतके प्रेम केले, की आम्हाला सार्वकालिक जीवन मिळावे म्हणून तो क्रुसावर मरण पावला. (१ पेत्र ३:१०, रोम ६:२३)

लक्षात ठेवा : सार्वकालिक जीवन येशू ख्रिस्ताद्वारे दिल्या गेलेले परमेश्वराबरोबरचे नाते आहे.

४. हे सार्वकालीक जीवन प्राप्त करण्यासाठी आम्ही आपल्या संपूर्ण हृदयासह स्वतःला समर्पित केले पाहिजे. (लूक १४:२६, २७ व ३३, रोम १०:९—१३)

**<u>उद्देश</u>** : सुवार्ता प्रचाराचा उद्देश लोकांना केवळ स्वर्गात घेऊन जाणे नव्हे, तर त्यांनी सार्वकालिक जीवनाचा स्वीकार करावा, म्हणून त्यांना मदत करण्यासाठी. योहान १७:३ मध्ये सांगितल्याप्रमाणे, ''सार्वकालिक जीवन हेच आहे, की तू जो एकच खरा देव. त्या तुला व ज्याला तू पाठविले त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे.'' लोकांना आपले जीवन एकत्र होताना पाहावयाचे आहे. त्यांना त्यांच्या जीवनाच्या समस्यांचे समाधान हवे आहे. त्यांच्या जीवनातील समस्या दूर होण्यासाठी संपूर्ण मनाने येशुला समर्पित होणे हा एकच उपाय आहे.

एखाद्या व्यक्तिने सार्वकालिक जीवनात प्रवेश करण्यासाठी तीन गोष्टींची पूर्तता केली पाहिजे. त्याने पश्चाताप करायला पाहिजे, येशुचा स्वीकार आणि पुनर्योजना केली पाहिजे. त्याचा पश्चाताप परमेश्वराप्रती असला पाहिजे. त्याने परमेश्वराच्या मनाला दुखावले, याबद्दल ख—या मनाने खेद व्यक्त करून पश्चाताप केला पाहिजे. त्याच्या परिवाराला किंवा अन्य कोणालाही त्यामुळे काय झाले, ही भावना नसावी. त्याने येशू ख्रिस्ताला आपला उद्धारकर्ता आणि प्रभू म्हणून स्वीकारले पाहिजे. आपले सर्वस्व परमेश्वराला समर्पित केल्यावरच ह्या सर्व बाबी होतील, (संबंध, ध्येय आणि आकांक्षा व निजी संपत्ती) (लूक १४:२६—२७ व ३३) पापापासून स्वच्छ होण्यासाठी येशू ख्रिस्ताने आपल्या सुटकेकरिता क्रुसावर आपले प्राण दिले, यावर विश्वास ठेवला पाहिजे. (इब्री ९:१४) आणि येशू ख्रिस्त त्याचा उद्धारकर्ता आहे, हे कबूल करण्यासाठी तयार व्हावे (रोम १०:९—१०), जर एखादी व्यक्ती खरोखरच पश्चाताप करत असेल आणि स्वीकार करत असेल, तर तो निश्चितच परमेश्वरावर प्रेम करत आहे. (योहान १४:२१—२३, १ योहान ५:१—३) सुवार्ता प्रचार करण्यासाठी हा पाठ तुम्हाला निश्चितच मदत करेल. प्रभावीपणे सुवार्ता प्रचार करण्यासाठी याचा तुम्हाला फायदा होईल. हरवलेल्या आत्म्यांसाठी ज्याप्रमाणे तुम्ही प्रार्थना करता त्याप्रमाणेच तुमचा सुवार्ता प्रचार प्रभावशाली होईल.

**ध्येय** : सुवार्ता प्रचाराचे ध्येय, सुवार्तेचा संदेश साधारण व स्पष्टरितीने प्रस्तुत करावा. यामुळे पवित्र आत्मा एका व्यक्तिला उद्धाराकडे खेचेल (आत्मिक जन्म) (रोम १०:१४—१६, योहान ६:४४, ३:३, ५—६)

## सुवार्ता प्रस्तुतीसाठी काही पाय—या

**प्रथम पायरी** : तुम्ही खात्री करा, की तुम्ही प्रार्थना केली आहे. तुमच्या व परमेश्वराच्या मध्ये अडखळण येणारे काहीतरी असे पाप आहे, ज्याचा तुम्ही स्वीकार केला नाही. केवळ धार्मिक कर्तव्य म्हणून तुम्ही सुवार्ता प्रचार तर करत नाही, याची खात्री करून घ्या. हरवलेल्या आत्म्यांसाठी ज्यांच्या मनात प्रेम व काळजी असते, त्यांनी संपूर्ण मनाने हे कार्य करा. स्तोत्र १२६:५—६

**द्वितीय पायरी : प्रथम गोष्ट किंवा प्रश्न**

कोणत्याही व्यक्तिला आपल्या मनातील विचार प्रगट करण्यासाठी वेळ द्या. ह्यामुळे त्याचे हृदय सुवार्ता ऐकण्यासाठी उघडले जाईल. कोणताही प्रश्न किंवा गोष्ट विस्तृत स्वरूपात सांगा आणि हे सर्व सांगताना अशाप्रकारे सांगा, की लोकांच्यात आवड निर्माण होईल. काळ—वेळ यानुसार, संस्कृती व सामाजिक स्वरूपात आपले बोलणे मांडा.

**उदा. १** : येशू ख्रिस्त आणि विहिरीजवळ असलेली स्त्री — योहान चार मध्ये लिहिले आहे, ''मला पिण्यासाठी पाणी दे आणि माझ्याजवळ जीवनाचे पाणी आहे.''

**उदा. २** : भारतात आम्ही कधी—कधी विचारतो, ''तुम्हाला परमेश्वराकडे जाण्याचा मार्ग गवसला आहे का ?'' भारतीय समाज परमेश्वराचा मार्ग शोधण्यासाठी उत्सुक असतो. परमेश्वराने तुमच्यासाठी केलेले साक्षीचे वचन तुम्ही ज्यांना ओळखता त्यांच्यासाठी आहे. ज्यांची समस्या एकसमान आहे त्यांचासुद्धा उपयोग होऊ शकतो. कारण ऐकणारा देखील उपयोगी आहे.

**उदा.** : आरोग्य प्राप्त झाल्याची साक्ष एकमेकांत आवड निर्माण करू शकते. कारण त्यांच्यात एकसमान आजार असू शकतो.

तृतीय पायरी : सुवार्ता संदेश

**क पाप — (रोम ३:२३)**

**प्रश्न : तुम्ही पापी आहात याची तुम्हाला जाणीव आहे का ?**

**उत्तर** : एक पाप झाले तरी पापी ठरतो, याची त्यांना जाणीव करून द्या. परमेश्वराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही गोष्टीसाठी जगणे पाप आहे. ते परमेश्वरावर प्रेम करत नाही परंतु परमेश्वर मात्र त्यांच्याबद्दल चांगला विचार करतो. १ योहान ३:४—१ :, नीती. २:४ रोम १४:२३ ब

**दृष्टान्त** : एक ग्लास फळाच्या रसात फक्त एक थेंब विष पडल्यास ते पिण्यायोग्य राहत नाही.

**ख : वेगळेपणा (रोम ६:२३)**

**प्रश्न : पापाचा परिणाम काय होतो, हे तुम्हाला माहीत आहे का ?**

**उत्तर** : त्याचे उत्तर काहीही असो परंतु पापामुळे तो परमेश्वरापासून वेगळा पडला आहे, याची त्याला जाणीव करून द्या. पापी जीवन त्याचा परिवार, त्याचे मित्र व त्याच्या समाजाचा नाश करतात. पापामुळे सार्वकालिक जीवनप्राप्तीसाठी अडखळण निर्माण होते. पापामुळे समस्या निर्माण होतात किंवा भविष्यात समस्या होतील — याची जाणीव त्याला करून द्या.
नीती : ३६:१४:११, स्तोत्र ९:१७, याकोब १:१३:१६.

**दृष्टान्त** : एखादा ट्रॅक्टर जर एका कारला चढावावरून खेचत असताना साखळीची केवळ एक कडी तुटल्यास ती कार ट्रॅक्टरपासून वेगळी होईल.

**ग. प्रतिष्ठापना (रोम ५:४)**

**प्रश्न : तुमच्यात असलेले पाप दूर होण्यासाठी परमेश्वराने जे काही केले, ते तुम्हाला माहीत आहे का ?**

**उत्तर** : या प्रश्नाचे उत्तर काहीही असो, परंतु त्यांना ते समजण्यासाठी मदत करा. येशू त्यांच्यावर प्रेम करतो म्हणूनच त्याने मरण पत्करले. कोणीही चांगल्या गोष्टीपासून वंचित राहू नये अशी त्याची इच्छा आहे. पाप काही क्षणासाठी चांगले वाटते परंतु शेवटी त्यामुळे नुकसान होते. कारण पाप हे देवाने जगाला घालून दिलेल्या नियमाविरुद्ध आहे. (परमेश्वराचे नैतिक नियम चांगल्या गोष्टींसाठी आहे) त्यांना सांगा, की परमेश्वर त्यांना सार्वकालिक जीवन देऊ इच्छितो — (खरी शांती, आनंद, हर्षोल्हास) तुम्ही पापापासून दूर व्हावे, त्यावर विजय प्राप्त करावा यासाठी परमेश्वर तुमची मदत करण्यास उत्सुक आहे. त्याला तुमची किती काळजी आहे, हे त्याने दाखवले आहे. आपल्या पापासाठी त्याने येशूला मरण पत्करण्यास पाठवले. येशुने आपल्या पापांची शिक्षा भोगली. कोणत्याही व्यक्तिचा चांगलेपणा व त्याचे धार्मिक कार्य, त्याची पापापासून मुक्तता करू शकत नाही. कारण धुळीने — धूळ स्वच्छ होऊ शकत नाही. योहान ३:६, १ योहान ३:४, रोम ६:५—६

**दृष्टान्त** : मृत्युदंडाची शिक्षा ठोठावलेले कैदी जर स्वत: शिक्षेसाठी समोर आले तर मरण पावतील. परंतु तेच जर त्यांच्याऐवजी दुस—या कोणी ती शिक्षा भोगली तर त्या कैद्यांची सुटका होईल.

**समर्पण :**

**प्रश्न : पापापासून मुक्त होऊन परमेश्वराचे सार्वकालिक जीवन कसे प्राप्त करावे, आहे तुम्हाला माहीत आहे का ?**

**उत्तर** : एखाद्या व्यक्तिमध्ये सार्वकालिक जीवनाच्या प्राप्तीसाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते. त्यांनी पश्चाताप, स्वीकार आणि पुनर्योजना केली पाहिजे.

**१. पश्चाताप करा. रोम २:४**

**उत्तर** : पश्चाताप हा परमेश्वराप्रती असला पाहिजे. त्यांनी आपल्या पापामुळे परमेश्वराला दु:ख दिले, याबाबत त्यांनी खेद व्यक्त केला पाहिजे. त्यांच्यात पापापासून माघारी येण्याची इच्छा असली पाहिजे, त्याचप्रमाणे परमेश्वराच्या आज्ञेत राहून जगले पाहिजे.

**दृष्टान्त** : तुम्ही रस्त्यावरून चालत आहात. अचानक तुम्ही वळता आणि विरुद्ध दिशेला जाऊ लागता. कारण तुम्हाला पुढे धोका दिसतो.

**२. स्वीकार करणे (रोम : १०:९:१३)**

**उत्तर** : त्यांनी येशुला आपला उद्धारकर्ता व प्रभू म्हणून स्वीकारले पाहिजे. जेव्हा आपण आपले संपूर्ण जीवन समर्पित करु, तेव्हा हे होईल – (नातीगोती, ध्येय आणि आकांक्षा तसेच संपत्ती.) परमेश्वरासाठी लूक १४:२६–२७ व ३३. त्याचप्रमाणे येशू ख्रिस्ताचा मृत्यू व पुनरुत्थानावर विश्वास ठेवतील. येशुच्या साहाय्याने त्यांचे पाप दूर केल्या जाईल व परमेश्वराच्या आज्ञेत राहण्यासाठी त्यांना सामर्थ्य प्राप्त होईल. त्यांनी कोणाकडेही, येशू ख्रिस्त त्यांचा उद्धारकर्ता आहे, हे कबूल करावे. (१ योहान १:९, इब्री. ९:१४)

**दृष्टान्त** : एक व्यक्ती त्याच्या व्यवसायाची देखरेख करण्यासाठी एका व्यवस्थापकाची नेमणूक करतो. त्या व्यक्तिला चांगल्याप्रकारे माहीत असते, की आपण ज्याची नेमणूक केली त्याने योग्य ते प्रशिक्षण प्राप्त केले आहे, त्यामुळे तो योग्यप्रकारे व्यवस्थापन करु शकतो. ती व्यक्ती त्या व्यवस्थापकाबद्दल अभिमानाने सांगत असते.

**४. पुनर्योजना करणे : (रोम ६:१७:१०)**

आम्ही जेव्हा ख्रिस्तावर संपूर्ण विश्वास ठेवतो, तेव्हा आपण आपल्या जीवनाची पुनर्योजना करणे आवश्यक असते, असे त्यांना समजावून सांगा. यामुळे ते परमेश्वराच्या आज्ञेत राहून जगू शकतील. कारण परमेश्वर आमच्याकडून चांगल्या गोष्टींची अपेक्षा ठेवतो.

**दृष्टान्त** : आम्ही वाहतूक पोलिसावर विश्वास ठेवतो, कारण आम्हाला ठाऊक असते की त्याच्या दिशा निर्देशातच आमचे भले आहे.

**निष्कर्ष** : तुम्ही तुमचे हृदय पूर्णपणे येशू ख्रिस्ताला समर्पित करण्याची इच्छा बाळगता का ?

**उत्तर** : हा सुवार्ता प्रस्तुतीकरणाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. एका मनुष्याचे अनंतकाळाचे भाग्य तराजूवर पाहिल्या जाते. जर ते समर्पण करण्यास इच्छुक नाही तर सुवार्ता प्रस्तुतीला सावध होऊन पहा. त्यांना विचारा, की या विषयातील कोणता भाग त्यांना समजला. त्यांना जो भाग नाही समजला तो पुन्हा एकदा शांतीने व अधिक अभ्यासपूर्ण पद्धतीने समजावून सांगा. यानंतर जर त्यांना सुवार्ता काय आहे हे समजले असेल, तर त्यांना पुन्हा प्रश्न विचारा व पुन्हा एक वेळ त्यांची ख्रिस्ताला जीवन देण्याची इच्छा नसेल, तर आपले जीवन समर्पित न केल्यास त्याचे जीवनावरील अनिष्ट परिणाम त्यांना सांगा.

**त्यांना समजावून सांगा :**

१. लोकांना जेव्हा पाहिजे तेव्हा ते परमेश्वराजवळ जाऊ शकत नाही, परंतु परमेश्वराच्या आत्म्याच्या ओढीने लोक त्याकडे जाऊ शकतात. (योहान ६:४४)
२. कोणीही उद्याचे वचन दिले नाही. ते जर त्याचवेळी मेले तर परमेश्वराच्या अनंतकाळच्या न्यायनिवाड्याचा सामना करावा लागेल. २ करिंथ ६:२
३. परमेश्वराच्या जवळ येण्यास त्यांनी नकार दिल्यास, हे अजून कठीण आहे परंतु अशक्य नाही. नीती २९:१

हे सर्व काही निश्चित झाल्यावर जर ते निर्णय घेण्याच्या महत्त्वाला समजतात, तर त्यांना पुन्हा प्रश्न विचारा. त्यांनी पुन्हा नकार दिल्यास, परमेश्वराचे त्याच्यावर किती प्रेम आहे, तुमचे किती प्रेम आहे ते सांगा. त्यांच्या या कृतीचा लेखाजोखा परमेश्वराकडे द्यावा लागणार आहे.

जेव्हा एखादी व्यक्ती येशू ख्रिस्ताला जीवन समर्पित करण्याची इच्छा प्रदर्शित करते, तेव्हा त्यांना सांगा, की तुम्ही त्यांच्यासाठी प्रार्थना कराल. तुम्ही त्यांच्यासाठी मन:पूर्वक प्रार्थना करा.

तुम्ही परमेश्वराला प्रार्थनापूर्वक सांगा, की ते त्यांच्या पापासाठी फार लज्जीत आहेत व आता ते स्वत:ला परमेश्वराकडे समर्पित करून आपले जीवन बदलण्याची इच्छा बाळगतात. ते आपले जीवन व आपले सर्वस्व येशू ख्रिस्ताला देण्यास तयार आहेत. येशू ख्रिस्ताने त्यांच्या अंत:करणाचा ताबा घ्यावा आणि त्यांना पवित्र आत्म्याने परिपूर्ण करावे, अशी प्रार्थना करा. आपले जीवन येशुला समर्पित करुन, केवळ त्याच्यासाठीच आता जगायचे आहे. परमेश्वराला धन्यवाद देऊन येशुच्या नावाने प्रार्थना करा.

**<u>शेवटचा प्रश्न</u> : तुमच्यासाठी येशू ख्रिस्त कोण आहे.**

**<u>उत्तर</u>** : माझा प्रभू व उद्धारकर्ता, असे उत्तर कोणी न देता अन्य दुसरे उत्तर दिल्यास त्यांना त्याचे अधिक स्पष्टीकरण मागा. जर त्यांना काही गैरसमज असल्यास तो दूर करण्याचा प्रयत्न करा.

**<u>चौथी पायरी</u> : कापणीला सांभाळणे**

ज्याप्रमाणे शेतकरी कापणी केलेले धान्य योग्यप्रकारे ठेवतो, त्याप्रमाणे कोणतीही व्यक्ती, मंडळी किंवा समाज ख्रिस्तामध्ये आल्यास त्याचा योग्यप्रकारे सांभाळ करणे आवश्यक असते. त्यांचे समर्पण कसे करायचे हे समजले नाही तर त्यांची अवस्था योग्यप्रकारे धान्य न ठेवल्यासारखी होईल. ज्या व्यक्तिने आपले जीवन येशुला समर्पित केले, त्याला प्रेमपूर्वक लक्ष देऊन सांभाळावे.

क. तुम्ही आत्ताच जीवनातील सर्वात महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन येशुचा स्वीकार केला आहे. पवित्र शास्त्रात याला आत्मिक जन्म असे म्हणतात. योहान ३:३, ५—६.

ख. तुम्ही परमेश्वराची लेकरे आहात आणि त्याच्यासाठी जगण्यास तुमच्यात सामर्थ्य आहे. योहान १:१२—१३ रोम १५:१६ कारण त्याचा पवित्र आत्मा तुमच्यात जिवीत राहतो. परमेश्वराने तुम्हाला पवित्र आत्म्याने परिपूर्ण करावे अशी प्रार्थना करा. त्याने आपल्याला वचन दिले आहे, की जर आपण त्याला प्रार्थनापूर्वक काही मागितल्यास तो ते देईल. पवित्र आत्म्याने परिपूर्ण करावे याकरीता त्यांच्यासाठी मध्यस्थीची प्रार्थना करा. प्रे. कृत्ये २:४, ४:३१,
लूक ११:१३

ग. तुमच्या जीवनातील परमेश्वराचे उद्देश पूर्ण व्हावे यासाठी त्याने त्यांना वाचवले. ज्याप्रमाणे जगण्यासाठी व वाढण्यासाठी शारीरिक भोजनाची आवश्यकता असते, त्याप्रमाणे आत्म्याच्या जगण्यासाठी व वाढीसाठी आत्मिक भोजनाची आवश्यकता असते. या आत्मिक भोजनामुळे तुम्ही परमेश्वराचा उद्देश पूर्ण कराल. हे आत्मिक भोजन म्हणजे परमेश्वराचे वचन आहे. या वचनाचा म्हणजे पवित्र शास्त्राचा तुम्हाला रोज अभ्यास करायचा आहे, तसेच त्याप्रमाणे आज्ञापालन करायचे आहे. लूक ४:४, रोम ६:१७ तीमथी १:९

घ. एखादे लहान मूल अडखळून पडू शकते. ज्याप्रमाणे ते खाली पडते व उठून पुन्हा चालू लागते, अशाप्रकारे त्याची वाढ होत असते. त्याचप्रमाणे तुमची आत्मिकदृष्ट्या वाढ होत असताना संघर्ष होऊ शकतो व त्याचप्रमाणे खाली पडल्यावर पुन्हा उभे राहून चालावे लागेल. अशा संघर्षाच्या प्रसंगी घाबरून आपला मार्ग सोडू नका. तुम्ही येशू ख्रिस्ताचा अंगीकार केला हे विसरु नका. परमेश्वराच्या वचनाद्वारे तुम्ही आत्मिकदृष्टीने वाढत राहाल. परमेश्वर तुमची निश्चितच मदत करेल. १ योहान १:९, २:१, योहान १६:१३, १४:२६—२७ इफिस ३:१६

च. तुम्ही मनुष्य आहात त्यामुळे आत्मिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे तुमच्या समर्पणाचे नवीनीकरण करा. येशू ख्रिस्ताच्या प्रति त्याच्या पवित्र आत्म्याने परिपूर्ण व्हा. यासाठी रोज प्रार्थना करणे आवश्यक आहे. आपल्या इच्छेपेक्षा परमेश्वराची इच्छा पूर्ण करणे आवश्यक आहे. लूक ९:२३, योहान १५:७, २३—२४, गलती ५:१६ व २५ प्रे. कृत्ये. ४:३१, इफिस ५:१८

छ. येशू ख्रिस्त तुमचा उद्धारकर्ता आहे, असे तुम्ही सर्वांना सांगत राहिले पाहिजे. असे सांगितल्याने तुमच्या विश्वासात दृढता येईल आणि परमेश्वर तुम्हाला सदा आशीर्वादीत करेल. प्रे. कृत्ये १:८, १०:३२, ३३ लूक १२:८—९ याकोब ५:२०, स्तोत्र १२६:५—६

ज. तुम्ही पाण्याने बाप्तिस्मा घेऊन स्थानिक मंडळीचा एक भाग बनणे आवश्यक आहे. ही सार्वजनिक साक्ष आहे, जी हे सांगते की तुम्ही स्वत:चे नवीनीकरण केले व आता तुम्ही ख्रिस्ताचे आहात. आत्मिकदृष्टीने बलवान होण्यासाठी तुम्हाला अन्य ख्रिस्ती लोकाच्या संगतीत राहणे आवश्यक आहे. प्रे. कृत्ये २:३८—३९, इब्री : १०:२४—२५

ती व्यक्ती येशू ख्रिस्ताला आपले समर्पण करण्यास तयार असल्याची खात्री झाल्यावर त्याच्यासाठी रोज प्रार्थना करा. त्याचे नाव व पत्ता घ्या. त्याच्याकडे पवित्र शास्त्र राहील अशी व्यवस्था करा. त्याला व्यक्तिगत स्तरावर शिष्य बनवा. त्याला व्यक्तिगत स्तरावर शिष्य बनवणे शक्य नसल्यास अन्य साधनांनी (पत्र व्यवहार, भ्रमणध्वनी वगैरे) त्याच्याबरोबर संपर्क स्थापीत करा. त्याला पवित्र शास्त्रासंबंधी अभ्यासक्रम पाठवणे योग्य राहील.

जोपर्यंत ते स्थानिक मंडळीत एकरुप होत नाही, तोपर्यंत त्यांच्याबरोबर संपर्क साधून राहा.

**समस्या सोडवणे :**

**१. मी ख्रिस्तावर विश्वास ठेवतो, असे ते म्हणतात. परंतु त्यांची कृती वेगळी असते. ते शेवटी त्यांच्या मनाप्रमाणेच करतात.**

**उत्तर** : मला प्रभुजी, प्रभुजी असे म्हणणा—या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल मत्तय ७:२१. तुम्ही मनापासून परमेश्वराला समर्पित आहात का ? आम्हाला स्वर्गात जाण्याची आशा आहे, म्हणून आम्ही येशू ख्रिस्तासाठी जगतो व त्याचे नाव घेतो.

**२. परमेश्वर कोणाला नरकात पाठवू शकत नाही.**

**उत्तर** : ‘‘मी आनंदात आहे,’’ असे तुम्ही म्हणता. तुम्ही एक महत्त्वपूर्ण प्रश्न विचारला आहे. तुम्ही—आम्ही हे कोणत्याप्रकारे माहिती करु शकतो ? परमेश्वर कसा आहे हे तुम्ही कोणत्याप्रकारे माहिती करता. या गोष्टीला माहीत करण्यासाठी आपल्याजवळ दोन पद्धती आहेत.

**क.** मनुष्यामुळे — आम्ही एकत्र बसून परमेश्वराचे मनन—चिंतन करतो आणि एखाद्या निष्कर्षाप्रत पोहचतो. असे केल्याने काही लोकांचे विचित्र धार्मिक विचार आहेत. आपण कोणाला खरे मानावे ?

**ख.** प्रगटीकरणाने — परमेश्वराने पवित्र शास्त्र व त्याच्या एकुलत्या एक मुलाद्वारे आपले प्रगटीकरण केले आहे. प्रश्न हा नाही, की त्याच्याबद्दल कोण काय विचार करतो. परंतु परमेश्वराने त्याचा पुत्र येशू ख्रिस्त याच्याद्वारे पवित्र शास्त्राच्या माध्यमातून काय सांगितले ?.

**३. मी पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवत नाही**

**उत्तर** : ''मी पवित्र शास्त्रावर विश्वास ठेवत नाही, तुम्ही मला दुस—याप्रकारे समजवा,'' असे काही लोक म्हणतात.

आम्हाला पवित्र शास्त्राचा बचाव करायचा नाही, परंतु आम्ही या विरोधी सुर असलेल्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकतो. ''आम्ही पवित्र शास्त्राच्या नावावर विश्वास ठेवत नाही.'' ही एक आश्चर्यकारक गोष्ट आहे आणि ही तुमच्यासाठी आनंदाची बाब आहे, परंतु मी एक प्रश्न विचारतो, ज्या लोकांना सार्वकालिक जीवन पाहिजे, त्या लोकांविषयी पवित्र शास्त्रात काय सांगितले आहे ? हे ऐकल्यावर ते उत्तर देतील, की परमेश्वराची आज्ञा पालन करून, स्वर्ण—नियमांचे पालन करुन किंवा येशू ख्रिस्ताने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे. त्यानंतर तुम्ही असे म्हणू शकता, की पवित्र शास्त्राची कोणतीही माहिती नसताना तुम्ही पूर्णपणे चुकीचे उत्तर दिले. तसेच तुम्ही पवित्र शास्त्राचा उल्लेख तिरस्कारायुक्त केला व हे अतिशय चूक आहे.

**४. मी परमेश्वरावर विश्वास ठेवत नाही.**

**उत्तर** : का नाही ? मनुष्य परमेश्वरावर सहसा विश्वास ठेवत नाही. कारण पापापासून आपली मुक्ती व्हावी असे त्याला मनापासून वाटत नाही. परमेश्वराचे त्यांच्यावर प्रेम आहे. ही गोष्ट ते मान्य करतात किंवा परमेश्वराची त्यांच्याबाबत अतिशय उत्कट इच्छा आहे. त्यांचे उत्तरच, त्यांची समस्या उघड करुन दाखवते. पापापासून मुक्तता होण्यासाठी प्रत्येक व्यक्तिची स्वत:ची इच्छा असणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे परमेश्वराचे त्यांच्यावर प्रेम आहे. यावर त्यांनी विश्वास ठेवला पाहिजे.

**सारांश** : या पाठात ज्या गोष्टी सांगितल्या, त्या तुम्हाला सुवार्ता प्रचार करताना अतिशय उपयोगी ठरतील. यातील सर्व बाबींकडे विशेष लक्ष द्या, वचनांवर लक्ष केंद्रित करा. याचा उपयोग जे हरवले आहेत त्यांच्यासाठी प्रभावी पद्धतीने

करता येईल. जेवढा जास्त तुम्ही याचा उपयोग कराल तेवढी याची उपयोगिता सिद्ध होईल व हे तुमच्या हृदयात ठासून भरले जाईल. लक्षात ठेवा, सांस्कृतिक समुहापर्यंत पोहोचण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची गरज भासू शकते. यु.एस. सेंटर फॉर वर्ल्ड मिशन, १६०५ एलिजाबेथ स्ट्रीट पॅसाडेना, सी.ए. ९११०५.
तुम्ही अन्य लोकांना सुवार्ता सांगता यासाठी परमेश्वर तुम्हाला आशीर्वादीत करो. विविध समस्या सोडवण्यासाठी वर दिलेल्या गोष्टी 'इव्हॅन्जलिझम एक्सप्लोजन' जे डॉ. जेम्स केनेडी द्वारा लिहिले आहे, त्यावर आधारित आहे.

**आधारभूत प्रश्न** : विद्यार्थी जे शिकले ते त्यांच्या जीवनात लागू करण्यासाठी, त्यांना मदत करा.
सुवार्ता प्रस्तुतीकरणाचा अभ्यास करण्याची तुमची इच्छा आहे का ? यामुळे सुवार्ता प्रचार अधिक प्रभावी पद्धतीने करु शकता.

**व्यावहारिक लागूकरण** : आपल्या मित्र परिवारात सुवार्ता सांगण्याचा प्रयत्न करा.

# आधारभूत सुवार्ता प्रचार व शिष्यत्व
# प्रकरण ३ रे
# व्यक्तिगत साक्ष

<u>**नेतृत्व**</u> : विद्यार्थ्याबरोबर त्याच्या कार्यपद्धतीवर लक्ष द्या. प्रत्येक विषय त्याला समजला की नाही हे पहा.

<u>**अभ्यासाचा विषय**</u> : या पाठाचा उद्देश विद्यार्थ्याला एक चांगली व विस्तृत साक्ष लिहिण्यासाठी मदत करणे आहे. याचा उपयोग करुन ते अधिक चांगली साक्ष देऊ शकतील.

१. येशू ख्रिस्ताचा स्वीकार करण्यापूर्वी माझे जीवन –

२. येशू ख्रिस्ताची मला गरज आहे, याची मला जाणीव झाली.

३. मी ख्रिस्ती कसा झालो ?

४. ख्रिस्त माझ्या जीवनाला अर्थपूर्ण कसा बनवतो ?

५. परमेश्वराने तुमच्या ज्या गरजा पूर्ण केल्या त्याची एक यादी बनवा.
आरोग्य, आर्थिक, आशीर्वाद इत्यादी.

६. येशू ख्रिस्त कोणत्याप्रकारे माझे जीवन अर्थपूर्ण बनवतो ?

# आधारभूत सुवार्ता प्रचार व शिष्यत्व
# प्रकरण ४ थे
# सुवार्ता प्रचाराचे पवित्र शास्त्रीय सिद्धान्त

**अभ्यासाचे विषय** : या पाठाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्याला सुवार्ता प्रचाराचे पवित्र शास्त्रीय सिद्धान्त समजावणे होय. यामुळे ते याला आपल्या जीवनात लागू करु शकतील.

**नेतृत्व** : विद्यार्थ्यांबरोबर या प्रश्नांकडे लक्ष द्या. त्यांची उत्तरे मिळती—जुळती असली पाहिजे.

**क. १. प्रार्थना सिद्धान्त** : आमच्यासमोर समस्या आल्यास आम्ही काय केले पाहिजे ? लूक ११:१

२. आम्ही कोणत्या गोष्टींसाठी प्रार्थना केली पाहिजे ?

३. आम्ही दुस—यांची मदत करण्यासाठी कोणत्याप्रकारे कार्य केले पाहिजे ? मत्तय ९:३६—३७

४. आम्हाला सामर्थ्य कोठून प्राप्त होते ? प्रे. कृत्ये ४:३१

**ख. सामर्थ्याचे सिद्धान्त —**

१. आमच्या सामर्थ्याचे स्त्रोत काय आहे ? प्रे. कृत्ये १

२. आमच्या संदेशाला सामर्थ्य कोठून मिळते ? १ करिंथ. १:१

३. अन्य लोकांना परमेश्वराचे सामर्थ्य कसे दिसते ?

४. आमच्या संदेशाच्या सामर्थ्यात काय करण्याची क्षमता आहे ? इब्री. ४:१२

**ग. पेरणी व कापणीचे सिद्धान्त**

१. साक्ष देताना आमचे मन कसे असले पाहिजे ?

२. आम्ही पेरणी करतो त्याचा उत्पादनावर काय परिणाम होतो ? २ करिंथ ९:६

३. आम्ही कशाप्रकारे पेरणी केली पाहिजे ? गलती ६:६—१०

४. आम्हाला काय पेरले पाहिजे, कोठे पेरले पाहिजे व त्याचे परिणाम — लूक ८:५—१५

**घ. लोकांपर्यंत पोहोचण्याचे सिद्धान्त :**

१. येशुने योहान ४:५—४२ मध्ये कोणते पाच सिद्धान्त दाखवले ?

२. सुवार्ता सांगताना आम्ही कोणत्या दोन गोष्टींचा उपयोग करतो ? यहुदा १:२२—२३

३. सुवार्ता प्रचार करताना आम्ही कोणती गोष्ट नाही केली पाहिजे ? २ करिंथ ४:१—६

४. सुवार्ता सांगताना आम्ही कोणत्या गोष्टींपासून दूर राहिलो पाहिजे ? तीत ३:४ व ९

**च. परिणामाचे सिद्धान्त**

१. लोकांकडून पश्चाताप कोण करवून घेतो ? २ तीमथी. २:२४—२६

२. आम्ही जेव्हा परमेश्वराचे वचन सांगतो, तेव्हा तो कोणत्या गोष्टींची पूर्तता करतो ? यशया ५५:१०—११

**आधारभूत प्रश्न :**

विद्यार्थी जे शिकले त्यानुसार त्यांना जगण्यास मदत करा. वरील सिद्धान्ताचा उपयोग करुन तुमच्या जीवनासोबत कोणालाही जुळण्यासाठी, तुम्ही काय करु शकता ? व्यावहारिक स्वरुपात आपल्या जीवनात याला लागू करा.

सुवार्ता प्रचाराचे सर्व शास्त्रीय सिद्धान्ताना आपल्या जीवनात सक्रिय स्वरुपात शोधण्यास सुरुवात करा.

# आधारभूत सुवार्ता प्रचार व शिष्यत्व
# प्रकरण ५ वे
# सुवार्ता प्रचाराच्या पद्धती व मार्ग

<u>नेतृत्व</u> : विद्यार्थ्याबरोबर सर्व रुपरेषा पहा व त्याला प्रत्येक विषय समजला की नाही याची खात्री करा.

<u>अभ्यास विषय</u> : या प्रकरणाचा उद्देश, प्रभावी पद्धतीने वेगळ्या प्रकारे सुवार्ता प्रचार करण्यास मदत मिळावी व साक्ष देण्यास साहाय्य व्हावे, हा आहे. गरजवंतांची सेवा करण्यास याचा उपयोग करण्यासाठी करुणापूर्ण सेवा समजून घ्यावी.
कलस्से. ३:१६ मध्ये आम्हाला सांगितले, की कोणत्या प्रकारे परमेश्वराला त्याचे गौरव द्यावे. तो कोण आहे याची साक्ष देण्यासाठी तयार असावे. सुवार्ता प्रचाराच्या अनेक पद्धती असतात. येथे काही निर्देश व सूचना दिल्या आहेत याचा उपयोग करता येईल.

**१. वचनातून साक्ष देणे.**

वचनाचा प्रसार करणे—

अ. पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने.

इ. आम्ही आमचे रोजचे कार्य करीत असताना जेव्हा संधी मिळेल तेव्हा करु शकतो.

ई. विशेष कार्यक्रमाद्वारे पूर्वनियोजित योजना असल्यास साक्ष देता येते.

उ. एखाद्या व्यक्तिसाठी परमेश्वर पाचारण करतो तेव्हा याचा उपयोग होईल.

**२. लिखीत वचन**

क. नेहमी हस्तपत्रके आपल्यासोबत बाळगा.

ह्या सुवार्ता प्रचाराच्या हस्तपत्रकात लोकांच्या विविध समस्यांचा उल्लेख असावा. उदा. नशा, हताशपणा.

ख. पवित्र शास्त्र किंवा नवा करार देणे. यासाठी जन्मदिवस, येशू ख्रिस्ताची जयंती किंवा नवीन व्यक्तिच्या स्वागतपर प्रसंगी, काही विशेष प्रसंगी याचा उपयोग करता येईल.

ग. पत्रव्यवहार करणे, ज्या व्यक्तिसाठी आम्ही प्रार्थना करीत आहोत, त्याला विविध हस्तपत्रके किंवा पत्र पाठवून.

३. ऑडियो व विडियो तसेच पवित्र शास्त्राच्या स्वरूपात भेट म्हणून देता येईल. लक्षात ठेवा, परमेश्वराचे वचन एक सामर्थ्यशाली शस्त्र आहे. या शस्त्रामुळे आपल्याला पुराणमते तोडून सत्य गोष्टी आत्मसात करण्यास मदत मिळते. इ ब्री. ४:१२ व २ करिंथ. १०:४—५. हा एक असा बॉम्ब आहे ज्याचा परमेश्वराच्या वेळापत्रकानुसार स्फोट होईल.
यशया ५५:११
ख. कार्य करीत असताना साक्ष देणे, करुणापूर्ण सेवा हे असे जीवन आहे जे देण्याचे कार्य करते.

- पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने शारीरिक, मानसिक, भावनिक व आत्मिक गरजा असणा—यांची सेवा करणे. यामुळे आम्ही येशू ख्रिस्ताबद्दल आपल्या जवळपास असणा—यांना सांगू शकतो. मत्तय १०:७—११, २६—२७, लूक ६:१७—१८ प्रे : कृत्ये. १४:८—१०
- सेवा करीत असताना प्रथम स्थान विश्वासू लोकांना व त्यानंतर जगाला द्यावे. योहान १३:३५, गलती ६:१०
- आम्ही दुस—यांची सेवा करीत असताना नेहमी पवित्र आत्म्याच्या निर्देशांकडे लक्ष द्यायला पाहिजे.

### लक्ष द्या

एखाद्या गरजवंतासाठी तुम्ही काही करु शकले नाही तर त्याच्यासाठी प्रार्थना करा तसेच त्याच्यासोबत प्रार्थनेत सहभागी होत रहा.

### आधारभूत प्रश्न

विद्यार्थी जे काही शिकला त्यानुसार त्याला जगण्यास मदत करा.

१. वरीलपैकी सुवार्ता प्रचाराची कोणती पद्धत तुम्ही तुमच्या जीवनात लागू कराल ? हे करण्यासाठी तुम्ही काय कराल ?

### व्यावहारिक स्वरुपात हे तुमच्या जीवनात लागू करा.

करुणापूर्ण सेवा सुवार्ता, एखाद्या गरजवंताला शोधा व त्याला मदत करा, त्याच्या माध्यमातून सुवार्ता प्रचार सुरू करा. ह्या संदर्भात एक विस्तृत साक्ष लिहा.

# आधारभूत सुवार्ता प्रचार व शिष्यत्व
# प्रकरण ६ वे
# मैत्रीचा सुवार्ता प्रचार

**नेतृत्व** : विद्यार्थ्यांबरोबर रुपरेषा पहा. त्यांना प्रत्येक गोष्ट समजते की नाही याकडे लक्ष द्या.

**अभ्यास विषय** : सुवार्ता प्रचार हे प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तिचे आद्य कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे आम्ही यात सक्रीयतेने कसे सामील होऊ शकतो, हा पाठाचा मुख्य उद्देश आहे.

**ध्येय्य** : परमेश्वर आम्हाला ज्याप्रमाणे संधी देईल त्याप्रमाणे आम्हाला साक्ष द्यायची आहे, असा निश्चय करा.

**प्रकार** :

१. प्रथम किंवा सुरुवातीचा संपर्क
२. आधीपासून सुरु असलेला संपर्क
३. योजना आखून केलेला संपर्क

**पायरी** :

१. हरवलेल्या मित्रांची एक यादी बनवा परिवारातील सदस्य, शेजारी, सहकर्मी, मंडळीत भेटणारे इत्यादी. यात प्रत्येक दिवशी नवीन संपर्क स्थापित झाल्यास नवीन नाव जोडा.
२. त्यांच्यासाठी नित्यक्रमाने प्रार्थना करा. शक्य झाल्यास रोज प्रार्थना करुन परमेश्वराला सांगा, की त्यांच्या जीवनात असलेला सैतानाचा संपर्क खंडित करावा. पवित्र आत्म्याच्याद्वारे त्यांना त्यांच्या पापाची जाणीव व्हावी. ते धार्मिकता व न्याय याबद्दल सजग व्हावे.
३. रोज तुम्ही ज्या नवीन लोकांना भेटता, त्यांना येशू ख्रिस्ताविषयी सांगा. हा प्रथम संपर्क केवळ एकमेव संधी असू शकते.
४. रोज देण्यात येणारी साक्ष व हरवलेल्या लोकांना भेटणे हे एखाद्या वेळापत्रकाप्रमाणे असते. हरवलेल्या लोकांना भेटण्याची संधी शोधत रहा. हरवलेल्यांना भेटणे म्हणजे जणू काही अलौकिक भेट आहे. अशा लोकांना

भेटून त्यांना येशू ख्रिस्ताविषयी सांगा व त्यांची जी गरज असेल ती पूर्ण करण्यासाठी प्रार्थना करा.

५. सुवार्ता प्रचाराच्या उद्देशाने एखाद्या व्यक्तिला प्रत्येक आठवड्यत भेटण्याची योजना ठरवा. आपल्यासोबत अन्य ख्रिस्ती व्यक्तिला घ्या व त्यांना भेटा किंवा त्यांना आपल्या घरी बोलवा.

६. <u>साक्ष देताना</u>
   क. साक्ष देताना ती सुवार्ता प्रचारासाठी असावी.
   ख. हस्तपत्रिका, पवित्र शास्त्र किंवा नवा करार द्या.
   ग. काही प्रार्थना विनंती असल्यास विचारा आणि तुमची भेट संपण्याआधी त्यांच्याबरोबर प्रार्थना करा.

७. त्या व्यक्तिने जर येशुचा स्वीकार केला नाही, तर भविष्यात त्या व्यक्तिसाठी आपले दरवाजे नेहमी उघडे ठेवा. त्यांना तुमच्या घरी येण्याचे निमंत्रण देत रहा.

**<u>नियम</u>** : प्रकरण ७ पहा. घरोघरी सुवार्ता प्रचार

## <u>मैत्रीद्वारे सुवार्ता प्रचारांचे फायदे</u>

१. तुमच्या आसपास असणारे तुमचे मित्र किंवा ओळखीचे लोक यांना येशुविषयी सांगणे एक स्वाभाविक बाब आहे.
२. आई—वडील, मुलांबरोबर, मित्र—मित्रासाठी, शेजारी—शेजा—यांसाठी — अशाप्रकारे सुवार्ता पसरत असते व असे करणे अतिशय प्रभावी असते.
३. प्रेमळ भावना ठेवल्याने, लक्ष ठेवणारा मित्र असल्याने परस्पर सहयोगाची भावना वाढत जाते व मानसिक, शारीरिक व आत्मिक पोषण होते. ख—या शिष्यत्त्वासाठी या गोष्टी आवश्यक आहेत.
४. आपल्या परिवारातील एक भाग, मित्र, शेजारी किंवा सहकर्मी यांना ख्रिस्तामध्ये नेतृत्व देणे एक आनंदाची व उल्हासाची गोष्ट आहे.

## <u>मैत्रीपूर्ण सुवार्ता प्रचाराचा प्रभाव</u>

आपण आपल्या मंडळीचे निरीक्षण केल्यास एक गोष्ट प्रकर्षाने ध्यानात येते, की मंडळीतील ८० ते ९० टक्के लोक आपापल्या मित्र मंडळीच्या प्रभावाने आले आहेत. ८२ टक्के नवीन धर्म स्वीकारणारे जे लोक बिली ग्रॅहम यांच्या क्रुसेडमध्ये आले होते, ते ज्या मंडळीत सहभागी झाले, त्यात त्यांच्या मित्र परिवारांतील कोणी ना कोणी होते. मैत्रीपूर्ण सुवार्ता प्रचाराची काही तथ्ये

आणि परिणाम Oikos मधून घेतले आहेत. मैत्रीपूर्ण सुवार्ता प्रचाराच्या व्यावहारिकतेचे शिक्षण यातून मिळते.

**<u>आधारभूत प्रश्न</u>** : विद्यार्थी जे शिकला त्यानुसार त्याला जगण्यास मदत करा.

१. तुम्ही तुमच्या हरवलेल्या मित्रांची यादी तयार केली आहे का ? होय..... नाही..... जर नाही, तर आत्ताच असे करण्यास सुरुवात करा.
२. तुम्ही तुमच्या हरवलेल्या मित्रांसाठी दररोज प्रार्थना करता का ? होय..... नाही..... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरुवात करा.
३. तुम्ही तुमच्या हरवलेल्या मित्रांपैकी किमान एकाला तरी प्रत्येक आठवडी येशू ख्रिस्ताविषयी सांगता का ? होय...... नाही..... जर नाही, तर आत्तापासूनच असे करण्यास सुरुवात करा.
४. तुम्हाला जेव्हा – जेव्हा संधी मिळते तेव्हा तुम्ही येशू ख्रिस्ताविषयी अन्य लोकांना सांगता का ? होय..... नाही...... जर नाही, तर आत्तापासूनच असे करण्यास सुरुवात करा.

**<u>व्यावहारिक स्वरुपात लागू करा</u>** : या आठवड्यात एखाद्या मित्राला साक्ष सांगा व आलेला अनुभव विस्तृतपणे लिहा.

# आधारभूत सुवार्ता प्रचार व शिष्यत्व
# प्रकरण ७ वे
# घरोघरी सुवार्ता प्रचार

<u>**नेतृत्व**</u> : विद्यार्थ्याबरोबर त्याची रुपरेषा पहा. त्यांना प्रत्येक गोष्ट समजते की नाही याकडे लक्ष द्या.

<u>**अभ्यास विषय**</u> : या पाठाचा उद्देश घरोघरी सुवार्ता कशी जाईल, हे समजण्यास विद्यार्थ्याला मदत करणे. याद्वारे विद्यार्थी अशा सेवेचा भाग बनतील.

<u>**उद्देश**</u> : एका विशेष क्षेत्रातील प्रत्येक घरात सुवार्ता पोहचवणे

<u>**खाली दिलेल्या वस्तुंची आवश्यकता आहे**</u>

१. कागद किंवा वही यावर नाव, पत्ता तसेच दुस—या काही सूचना असल्यास लिहिता येतील.
२. मंडळी, त्यांच्या बैठकांची वेळ, ज्या प्रकारच्या सेवा उपलब्ध आहेत त्याची यादी, यांचा अंतर्भाव असलेली पुस्तिका. एक लिखीत विस्तृत संदेश जो लोकांच्या आवश्यकतांवर आधारित असावा, हा भेटीसमयी देता येतो. सुवार्ता प्रचाराची छोटी पुस्तिका.

३. आधारभूत सुवार्तेची हस्तपत्रके, यात पश्चाताप उद्धार व उर्वरित संदेश असावा.
४. विशेष आवश्यकता भासल्यास अन्य हस्तपत्रके, यात धर्म नशेच्या वस्तू किंवा पारिवारीक समस्या या विषयांचा समावेश असावा.
५. पवित्र शास्त्र किंवा नवा करार — ज्या घरात नसेल त्या घरात द्यावा.

**ध्येय** : प्रत्येक घरातील सदस्यांना ख्रिस्ताकडे आकर्षित करणे.

**ध्येय प्राप्तीसाठी काही पाय—या**

१. ज्या क्षेत्रात तुम्ही जाणार आहात, त्या क्षेत्राचा नकाशा विकत घ्या किंवा बनवा. तुम्ही मंडळीच्या सभेसाठी जिथे एकत्र येता तेथून कार्य सुरू केल्यास चांगले राहील.
२. एका विशेष क्षेत्रात जाण्यासाठी एखाद्या प्रशिक्षित समुहाला कार्य सोपवून द्या.
३. या समुहाने प्रार्थना व उपास केले पाहिजे. त्या ‘विशेष’ क्षेत्रासाठी हा उपास असला पाहिजे. यामुळे तुम्ही ज्या क्षेत्रात जात आहात, त्या क्षेत्रातील आत्मिक ताकत असणा—यांवर तुमचा अधिकार राहील. सुवार्ता प्रचार करताना परमेश्वराने तुमचा अभिषेक करावा, तुम्हाला बुद्धी द्यावी, म्हणून प्रार्थना करा. सुवार्ता ऐकण्यासाठी प्रत्येक घराचे द्वार उघडावे यासाठी विशेष प्रार्थना करा.
४. त्या क्षेत्रातील प्रत्येक घरी भेट देण्याचा तुम्ही निश्चय करा व घरोघरी भेट देण्यास सुरुवात करा. तुम्ही अशी वेळ निवडा, की त्यावेळी लोक घरीच असतील परंतु ती वेळ जेवणाची किंवा आराम करण्याची नसेल याची काळजी घ्या. अंधार पडल्यावर लोकांची भेट घेणे योग्य नाही.
५. एका घरुन दुस—या घरी जाण्याची पद्धत — दरवाज्याची घंटी वाजवा किंवा त्याची कडी वाजवा. तीस सेकंदपर्यंत थांबा, कोणतेही प्रत्युत्तर न आल्यास पुन्हा तसेच करा व हाक मारा. कोणतेच प्रत्युत्तर न आल्यास तेथील नाव पत्ता व दिनांक किंवा अन्य सूचना यांची नोंद करा.

**घरात कोणी हजर असल्यास**

१. आपली ओळख करुन द्या.
२. त्या क्षेत्रातील लोकांच्या आत्मिक गरजा भागवण्यासाठी तुम्ही आला आहात, असे त्यांना सांगा.
३. त्यांना बोलू द्या, त्यांना त्यांचे कार्य, परिवार इत्यादी विषयी प्रश्न विचारा.

४. त्यांना विचारा –

क. ह्या ठिकाणी ते कधीपासून राहात आहेत ?

ख. कोणत्या धर्मात त्यांचे पालन–पोषण झाले ?

ग. तुम्ही सध्या कोणत्या विशेष मंडळीत जाता का ?

घ. जीवनात येणा–या समस्यांविषयी मी आपणासोबत बोलू का ?
सुवार्ता प्रचाराची जी हस्तपत्रके आहेत त्याचा वापर करुन सुवार्ता सादर करा.

५. त्या परिवाराच्या आत्मिक गरजांविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करा. तेथून निघाल्यावर सर्व महत्त्वपूर्ण गोष्टींची नोंद तुमच्या वहीत करा.

६. त्यांनी सुवार्तेचा स्वीकार केल्यास प्रकरण क्र. ९ मधील कार्यक्रमाची पद्धत वापरा.

७. त्यांनी सुवार्तेचा स्वीकार न केल्यास, परंतु तुमचे म्हणणे ऐकण्याची परवानगी दिल्यास भविष्यात त्यांच्या भेटीसाठी तुम्ही आपले दरवाजे उघडे असल्याचे सांगा.

८. तुमची भेट प्रार्थनेने संपवा आणि त्यांची काही विनंती किंवा अन्य काही विशेष असल्यास त्याबद्दल विचारपूस करा.

<u>एका घरुन दुस–या घरी जाण्याचा नियम</u> :

१. नेहमी सभ्य रहा व चेहरा हसतमुख ठेवा. त्यांनी दिलेल्या वेळेबद्दल त्यांना धन्यवाद द्या.

२. भविष्यात जेव्हा त्या भागात जाल, तेव्हा त्यांच्या घरुन जा.

३. तुमच्या वहीत छोट्या–मोठ्या गोष्टींची नोंद करा.

४. तुमचे कपडे स्वच्छ असले पाहिजेत. योग्यप्रकारे तयार होऊन गेल्यास तुमची छाप पडू शकते. अव्यवस्थितपणा तुमच्या कार्याला बाधक ठरु शकतो.

५. तुम्ही विवाहित असल्यास दोघे एकत्र निघा. अविवाहित असल्यास तीन–तीनच्या समुहात रहा.
या समुहात एक स्त्री–दोन पुरुष किंवा एक पुरुष – दोन स्त्रिया असावे.

६. तुम्ही बोलत असताना लहान मुले उत्तर देत असतील तर त्याला त्याच्या आई किंवा वडिलांना बोलवायला सांगा.

७. तुम्ही बोलत असताना, ज्यांच्याबरोबर बोलत आहात त्यांच्यापासून अंतर ठेवून बोला. आपले बोलणे अगदी हळूवारपणे समजावून सांगा, तुम्ही जोरजोराने बोलल्यास ते शिष्टाचाराला धरुन राहणार नाही. यावरुन तुमची सहनशिलता दिसते, कारण तुम्ही बोलत असताना कोणीतरी तुमच्याकडे पाहत असेल.

८. तुम्ही जेव्हा प्रथम घरुन दुसऱ्या घरी जाता त्यादरम्यान आपल्या समुहातील कोणाबरोबर काहीच बोलू नका. जोपर्यंत तुम्ही, तुमचे बोलणे कोणाच्या कानावर ऐकू जाणार नाही, एवढ्या दूर जाणार नाही तोपर्यंत गप्प रहा.
९. तुम्ही ज्यांची भेट घेतली त्यांच्यासाठी प्रार्थना करा.
१०. तुम्ही जेव्हा एखाद्या घरी भेट देऊन येता, तेव्हा त्या भेटीच्या विषयावर एकमेकांबरोबर बोला. त्यात काही सुधारणा करायची असल्यास एकमेकांचा सल्ला घ्या.
११. तुम्ही ज्या घरी भेट देण्यास जाल, त्या घरी कोणीच न भेटल्यास एक अशी भेट निर्धारित करा, जी दोघांसाठी सोयीस्कर असेल. ती वेळ तुमच्या वहीत लिहा.
१२. प्रत्येक घरी सुवार्ता प्रचारासंबंधी एक साहित्य देण्याचा प्रयत्न करा.
१३. सुवार्ता ऐकण्याची मन:स्थिती तयार झाल्यावर त्यांना निरंतर भेटत रहा. ख्रिस्तात समर्पण केल्यावर प्रकरण क्र. ९ मधील सूचनांचे पालन करा.
१४. ध्येय्य प्राप्तीच्या ह्या रुपरेषांच्या पायऱ्या लक्षात ठेवा. याचा उपयोग तुम्हाला तुमच्या कामाचे अवलोकन करण्यास होईल.

<u>आधारभूत प्रश्न</u> :

विद्यार्थी जे काही शिकला त्यानुसार त्याला जगण्यास मदत करा.

१. तुम्ही घरोघरी जाऊन सुवार्ता प्रचार केला आहे ? होय..... नाही.... जर नाही, तर तुम्हाला अशाप्रकारच्या सेवेसाठी पाचारण आहे, की नाही हे जाणून घेण्यासाठी एकदा एखाद्या समुहाबरोबर सुवार्ता सांगण्यास जा.
२. तुम्हाला सुवार्ता प्रचाराचे पाचारण असल्यास तुम्ही ते कार्य करत आहात का ? होय..... नाही.... जर नाही, तर आजपासूनच असे करण्यास सुरुवात करा.

व्यावहारिक स्वरुपात ह्या गोष्टी लागू करा. अशा प्रकारचे कार्य करणारा एखादा समूह शोधा व त्यांच्याबरोबर सुवार्ता प्रचाराचे कार्य करा. याबाबत तुम्हाला आलेला अनुभव विस्तृत स्वरुपात लिहा.

# आधारभूत सुवार्ता प्रचार व शिष्यत्व
# प्रकरण ८ वे
# रस्त्यावरील सेवा

<u>नेतृत्व</u> : विद्यार्थ्याबरोबर सर्व रुपरेषा पहा. त्याला सर्व विषय समजले की नाही याची खात्री करा.

<u>अभ्यास विषय</u> : रस्त्यावरील सेवा करणा—या एका समुहाचा भाग बनण्यासाठी विद्यार्थ्याला त्यातील मौलिक सिद्धान्त समजावे, हा या पाठाचा मुख्य उद्देश आहे.

<u>उद्देश</u> : एखाद्या विशेष क्षेत्रातील लोकांना सुवार्ता सांगणे

<u>ध्येय</u> : असत्याच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन सत्यतेचे निरोगी वातावरण निर्माण व्हावे.

१. <u>**नियम — बी पेरणे**</u>
क. हरवलेल्यांबरोबर असलेली नाती पुनर्स्थापित करण्यासाठी याचा उपयोग केला आहे. हरवलेल्यांनी येशुचा स्वीकार करावा.
ख. हस्तपत्रके देणे.
ग. चिन्ह
घ. क्रुसखांब
ड. रस्त्यावरील प्रचार — सुवार्ता संदेशाची घोषणा करणे.
१. विषय — विषय म्हणजे काय ?
२. रेखांकित करणे — याचा अर्थ काय ते आम्हाला सांगा.
३. लागू करणे.
४. आपल्या विषयाला समजून घ्या.
५. आपल्या लोकांना जाणून घ्या.
६. चांगला व्यवहार करा.

क. हावभावचा उपयोग करा.
ख. मनन करण्याचा विषय — जेव्हा तुम्ही बोलत असता तेव्हा विचार करा.
ग. पुन:निर्देश — तुम्हाला ते काय समजतात याचा शोध घेणे.

घ. धाडस – बोलण्या – चालण्याचे स्वातंत्र्य कायम ठेवणे.
ड. संगीत.
च. नाटक.
छ. चलचित्र – सिनेमा.
ज. चौक – गोष्टी तथा चित्र बनवणे.

<u>नियम</u> **: आपल्या आत्म्याने तयार रहा.**
ख. व्यक्तिगत उपस्थिती.
ग. एखाद्या साथीदाराबरोबर जा.
घ. शक्य होईल तेव्हा अधिकारात करा.
ड. वितंडवाद करु नका. ज्यांना भूख नाही त्यांना जेवू घालता येत नाही.
च. भविष्यात विद्रोहाला दूर करा.
छ. दुस–यांच्या आवश्यकतांच्या बाबत संवेदनशील रहा.
ज. जेव्हा शक्य असेल पाठपुरावा करत रहा.
झ. विश्वासयोग्य रहा – सुवार्ता प्रचार करणारे अनेक सुवार्तिक वर्षानुवर्षे परिवाराविना साक्ष देत होते. परिणामांची चिंता न करता सर्वकाही परमेश्वराच्या हवाली करा.

२. अनुकरणीय कार्यक्रमासाठी स्वत:ला तयार करा.
क. सदस्यांनी श्रद्धाळू व समर्पित जीवनशैलीचा अंगीकार करावा, यासाठी पुढाकार घ्या.
ख. सेवेच्या सुविधांना तयार करा.
१. कॉफीचे, चहाचे दुकान
२. सुवार्तिकांसाठी सेवा घर – यामुळे शिष्य बनवण्यास मदत मिळेल.
३. कपडे व धान्य ठेवण्याचे स्थान.

ग. नवीन धर्मपरिवर्तकला त्यांच्या ख्रिस्ती चालीरितीमध्ये स्थापित होण्यास मदत व्हावी, यासाठी आपल्या बहीण भावांना प्रशिक्षण द्या.

विद्यार्थी जे शिकला त्यानुसार जगण्यात त्याला मदत करा.
१. नेमून दिलेल्या रस्त्यावर सेवेच्या प्रकारांपैकी कोणता प्रकार करण्याची तुमची इच्छा आहे. ?
२. सुवार्ता संदेश देण्यासाठी तुमच्याकडे कोणते विचार आहेत. ?
३. पहिल्या दोन प्रश्नांमध्ये सूचित केलेल्या प्रकारांना तुम्ही कधी व कशी सुरुवात करु शकता ?

४. रस्त्यावरील सेवेअंतर्गत असलेल्या नियमांपैकी कोणत्या नियमाचे पालन करणे तुम्हाला कठीण वाटते ? का ?
५. नवीन धर्मपरिवर्तन करणा—यांना मदत व्हावी या दृष्टीने तुमच्या मंडळीत कोणत्या गोष्टींचा विकास होण्याची गरज आहे ?
६. अनुकरणीय मार्गाचा तुम्ही कसा विकास करु शकता ?

**व्यावहारिक स्वरुपात लागू करा**

रस्त्यावर सेवा करणा—या समुहाबरोबर एक तास काम करा व त्या एक तासाच्या अनुभवावर विस्तृत साक्ष द्या.

# आधारभूत सुवार्ता प्रचार व शिष्यत्व
# प्रकरण ९ वे
# अनुकरणीय कार्यक्रम (अनुकरण करणारे)

**नेतृत्व** : विद्यार्थ्याबरोबर रुपरेषा पहा. प्रत्येक विषय त्याला समजला याची खात्री करा.

**अभ्यास विषय** : नवीन धर्म स्वीकारणा—याला शिस्त लावण्यासाठी त्याला आपले अनुकरण करणारे कसे बनवावे, हे विद्यार्थ्याला समजावे. हा या पाठाचा मुख्य उद्देश आहे.

**उद्देश** : नवीन विश्वासुच्या जीवनात ख्रिस्ताची स्थापना केल्यास तो येशू ख्रिस्तासाठी जगेल.

**ध्येय** : नवीन विश्वासुला खालील गोष्टीत स्थापित करा —
१. प्रत्येक दिवशी पवित्र शास्त्राचा अभ्यास.
२. प्रत्येक दिवशी प्रार्थना
३. पाण्याने बाप्तिस्मा
४. पवित्र आत्म्याने परिपूर्ण जीवन
५. साथ — संगत
६. त्यांच्या जीवनातील परमेश्वराच्या इच्छेचा शोध घेणे.

**पायरी** : **१.** प्रारंभी नवीन व्यक्तिबरोबर संपर्क स्थापित करा. त्यांना भेटीसाठी बोलवा, तुमचा संपर्क झाल्यावर शक्य झाल्यास चोवीस तासांच्या आत.

नमस्कार मी........... या मंडळीकडून आलो. आम्ही तुमच्यासाठी प्रार्थना करीत आलो. तुम्ही येशू ख्रिस्ताचा स्वीकार करावा अशी आमची इच्छा आहे............ मी तुम्हाला ख्रिस्ती जीवन जगण्यास मदत करु इच्छितो. तुम्ही मला............ वाजता भेटू शकता का ?
२. पवित्र शास्त्राचा अभ्यास सुरु करा. पहिल्या भेटीत पाठ क्र. १ पासून सुरुवात करा. 'आधारभूत ख्रिस्ती जीवन' यावर आधारित तो पाठ असेल.
३. त्यांना मंडळीत येण्यासाठी आमंत्रण द्या किंवा आपल्या सोबत घेऊन या.

४. मंडळीत एकरुप होईपर्यंत त्यांना आठवड्यातून दोन वेळा भेटत रहा.
५. प्रत्येक दिवशी त्यांच्यासाठी प्रार्थना करा. प्रार्थनेद्वारे त्यांना उत्साहित करत रहा. त्यांना पाण्याने बाप्तिस्मा, पवित्र आत्म्याने परिपूर्ण असलेले जीवन आणि त्यांच्या जीवनातील परमेश्वराची इच्छा शोधणे, अशा विषयावर बोलून त्यांचा उत्साह वाढवत रहा.

**आधारभूत प्रश्न** :

विद्यार्थी जे शिकला ते त्याच्या जीवनात लागू करण्यासाठी, त्याला मदत करा.

या पाठात दिलेल्या निर्देशतत्त्वांचा उपयोग करता का ?
होय......... नाही........ जर नाही, तर आजपासून असे करण्यास सुरुवात करा.

ज्या लोकांना तुम्ही प्रभुमध्ये आणता, त्यांच्या जीवनात याला व्यावहारिक स्वरुपात लागू करा. त्यांना शिष्य बनवण्यास सुरुवात करा, यासाठी दिलेल्या निर्देश तत्त्वाचा उपयोग करा.

# आधारभूत सुवार्ता व शिष्यत्व
# प्रकरण १० वे
# लक्षात ठेवण्यासारख्या काही गोष्टी

**नेतृत्व** : विद्यार्थ्यांबरोबर रुपरेषा पहा. त्याला प्रत्येक विषय समजला याची खात्री करा.

**अभ्यास विषय** : प्रभावी पद्धतीने शिष्य बनवण्यासाठी आत्मिक वाढ आणि शिष्य बनवण्याचे मूलभूत सिद्धान्त समजण्यास मदत व्हावी, हा या पाठाचा मुख्य उद्देश आहे.

**उद्देश** : मत्तय २८:१८—२० मध्ये सांगितल्याप्रमाणे आम्ही शिष्य बनवले पाहिजे. दुस—यांना शिष्य बनवण्यासाठी आधी तुम्ही शिष्य बनले पाहिजे. सेवा आणि मंडळीची स्थापना करण्यासाठी सुवार्ता प्रचार व शिष्यत्त्व या गोष्टी आवश्यक आहेत. या पाठात तुम्हाला दाखवले आहे, की सुवार्ता प्रचार व शिष्यत्व म्हणजे काय असते. एका धर्म परिवर्तन करणा—याला खरा शिष्य कसा बनवता येईल.

— नवीन शिष्य बनवताना तुम्हाला पाच मौलिक गोंष्टींवर लक्ष देणे आवश्यक आहे. नवा करार लिहिणा—यांनी या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले आहे.

क. व्यक्तिगत जीवन
ख. पारिवारीक जीवन
ग. मंडळीतील जीवन
घ. सुवार्ता प्रचार
ड. शिष्यत्व

एखाद्या नवीन व्यक्तिला शिक्षण देताना, त्याला वचनांचा अभ्यास करु द्या. त्या वचनांवर आधारित मूलभूत प्रश्न त्याला विचारा. यामुळे त्याच्या जीवनात वचनांचे लागुकरण करण्यात मदत होईल.

**शिष्य** : येशू ख्रिस्तासाठी जगण्याकरिता परमेश्वराच्या सानिध्यात राहणे आवश्यक आहे, अशी व्यक्तिच उत्तम शिष्य बनू शकते.

**क. वचन ही जीवनाची भाकर आहे.**

१) हे वाचा इफिस. ३:४
२) याचा अभ्यास करा. २ तीमथी २:१५
३) यावर मनन करा — स्तोत्रसंहिता. १
४) हे लक्षात ठेवा — स्तोत्र. ११९:११
५) हे लिहा — हबक्कुक. २:२
६) असे जगा — रोम. ६:१७—१८
७) हे सांगा — १ योहान १:१—३

**ख. प्रार्थना**
१. स्वत:साठी भक्ती २६:४१
२. दुस—यांसाठी १ तीमथी २:१

**येशू ख्रिस्तासाठी — जे सामील आहेत.**
क. संगत — योहान १३:३५
ख. साक्ष देणे — मत्तय ५:१६

आम्ही जर शिष्य झालो तर आमची आत्मिक स्वरुपात वाढ होते. आत्मिक वाढीच्या तीन पाय—या आहेत.

क. बालपण
ख. तरुणपण
ग. प्रौढत्त्व.

आत्मिक वाढीत या गोष्टी सामील आहेत.

क. जुन्या व बुरसटलेल्या विचारांना दूर करुन आपल्यातील कमीपणावर विजय प्राप्त करणे. इफिस ४:१७, ५:१६
ख. येशू ख्रिस्ताची मनात स्थापना करणे. २ पेत्र १:५—१०
ग. आमच्या जीवनातील परमेश्र्वराचा उद्देश शोधणे व तो पूर्ण करणे — २ तीमथी १:९, इफिस ५:१७

शिष्यत्वात व्यक्तिगत कमकुवतपणा आणि सांस्कृतिक रितीरिवाजांचे बुरसटलेले विचार तोडण्यासाठी मदत करणे, व्यक्तिगत जीवनात पवित्र शास्त्रातील मूलभूत सिद्धान्त शिकणे, सुवार्ता प्रचार, प्रार्थना आणि वचनाची सेवा करुन आणि एखाद्या व्यक्तिला सेवेचे प्रशिक्षण देणे.

**सेवेचे कार्य** : येशू ख्रिस्ताच्या सेवेत निरंतर राहणे. यात खालील गोष्टींचा अंतर्भाव आहे.
क. प्रार्थना सेवा.

ख. वचन सेवा.
ग. गरजवंतांची सेवा.

परमेश्वर आपल्या लोकांना प्रत्येक समस्येवर विजय मिळवून देऊ इच्छितो. त्याचा उपयोग प्रत्येक ठिकाणी व्हावा अशी त्याची इच्छा आहे. प्रत्येकाला सार्वकालिक जीवनाचा आशीर्वाद देण्याची त्याची इच्छा आहे.

शिस्तप्रिय भाऊ किंवा बहीण जे आत्मिक दृष्टीने वाढ झालेले असतील, अशी व्यक्ती जी बुरसटलेल्या पुराणमतवादी गोष्टींना तोडून, परमेश्वराच्या वचनाने व प्रार्थनेद्वारे जीवनात विजय प्राप्त करते. त्याचप्रमाणे संपूर्ण मनाने समर्पित होऊन येशू ख्रिस्तासाठी जगते.

**शिस्त राहण्यासाठी व्यावहारिक पाऊल**

क. नवीन धर्मपरिवर्तन करणाऱ्याची आवश्यक ती माहिती घ्या.
    उदा. नाव — पत्ता इत्यादी.
ख. पवित्र शास्त्र किंवा नवा करार त्याला द्या व त्याचा उपयोग कसा करावा ते सांगा.
ग. दूरध्वनीद्वारे किंवा व्यक्तिशः भेटून संपर्क स्थापित करा. हा संपर्क चोवीस तासांच्या आत साधावा.
घ. व्यक्तिगत जीवनावर आधारित पारिवारीक जीवन, मंडळीतील जीवन व सुवार्ता प्रचाराच्या आधारभूत असलेल्या अभ्यासाला शक्य तितक्या लवकर पहा.

**आधारभूत प्रश्न**

विद्यार्थी जे शिकला त्यानुसार त्याला जीवन जगण्यास मदत करा.

१. तुम्ही शिष्य आहात का ? होय........ नाही......... जर नाही, तर आजपासून शिष्य बनण्याचा प्रयत्न करा.
२. तुम्ही अन्य लोकांना शिष्य बनवण्या इतके परिपक्व झाले आहात का ? होय....... नाही........ जर नाही, तर आजपासून परिपक्व होण्याची तयारी करा.
३. या पाठात दिलेल्या निर्देशतत्त्वांचा उपयोग करुन तुम्ही लोकांना शिष्य बनवण्याचा प्रयत्न करता का ? होय....... नाही........ जर नाही, तर आजपासून असे करण्यास सुरुवात करा.

# परिशिष्ट ‘क’
# यात टिकून राहण्यासाठी निर्देशतत्वे
# रोज प्रार्थना करणे

१. तुम्ही केलेल्या प्रत्येक दिवशीच्या मुख्य गोष्टींकडे लक्ष द्या. त्यात विशेष असलेल्या व ज्या आत्मिकदृष्ट्या महत्त्वाची असल्यास त्याबद्दल जेव्हा संधी मिळेल तेव्हा साक्ष द्या. ज्या लोकांना तुम्ही भेटला त्या लोकांविषयी विस्तृत माहिती लिहा. तुम्ही जो निर्णय घेतला, मनात आलेले विचार, चांगल्या व वाईट गोष्टी ज्या घडल्या असतील आणि तुम्ही केलेले कार्य या सर्वांचे मूल्यांकन करा. तुम्ही कोणत्या प्रकारे चुका करण्यापासून दूर राहू शकता ?

**उदा. जानेवारी ३, १९९२**
मी सुवार्ता प्रचाराच्या कार्यासाठी बाहेर पडलो. येशू ख्रिस्ताला सर्वांनी ओळखावे यासाठी मी त्याच्याबद्दल अनेकांना माहिती दिली. यासाठी मी रोज प्रार्थना करत होतो. मी बनवलेल्या यादीनुसार प्रार्थना केली व शेवटच्या वेळेसंबंधी असलेला समज स्वीकार केला. मत्तय २४ नुसार अभ्यास पाहिला व विशेष आर्थिक गरजांसाठी प्रार्थना केली.

२. प्रार्थनेची यादी तयार करा. यात हरवलेले लोक मंडळीचे सदस्य, राजकारणातील तसेच आत्मिक क्षेत्रातील नेतृत्व, सुवार्तिक आणि विशेष गरज असलेले वेगवेगळे लोक यांचा अंतर्भाव असावा.

**उदा.** हरवलेले, मंडळीचे सदस्य, नेतृत्व करणारे पुढारी, सुवार्तिक व विशेष गरज असलेले लोक इत्यादी.

३. एक प्रार्थना दैनंदिनी बनवा ज्यात विशेष गरजा, ज्या परमेश्वर दाखवतो व ज्याप्रमाणे त्याच्या वचनांचा तुम्ही अभ्यास करता.

**उदा.** मत्तय २४, जानेवारी ३—९२
वचन १४ द्वारे मला दिसते की येशुविषयी सुवार्ता सांगणे किती महत्त्वाचे आहे.
वचन २० व २१ मला प्रार्थनेचे महत्त्व सांगत आहे.
वचन ४४ पासून ५१ पर्यंत मला सांगत आहे, की परमेश्वराने मला जे सांगितले ते करणे माझ्यासाठी किती महत्त्वपूर्ण आहे.

# परिशिष्ट ‘ख’
# व्यक्तिगत प्रार्थना यादी

१. हरवलेला परिवार
   शेजारी
   सहकारी / वर्ग मित्र किंवा अन्य

२. मंडळीचे सदस्य
३. नेतृत्व करणारे / पुढारी
४. सुवार्तिक
५. आवश्यक गरजा
६. अन्य काही विनंती प्रार्थना

# परिशिष्ट ‘ग’
# प्रार्थनेसाठी सदैव तत्पर असणारे हृदय व व्यक्तिगत जागृती

स्तोत्रसंहिता १३९:२३—२४ : ‘हे देवा, मला शोध आणि माझे हृदय जाण, मला पारख आणि माझे मनोभाव जाण. आणि माझ्यामध्ये कोणताही दुष्टतेचा मार्ग असला तर पहा, आणि सर्वकाळच्या मार्गाने मला ने.’

परमेश्वराबरोबर राहण्यासाठी, त्याच्या लोकांमध्ये जागृतीसाठी पापाची कबुली देणे आवश्यक आहे. खाली दिलेल्या प्रश्नांना प्रार्थनापूर्वक पाहा. प्रत्येक प्रश्न काळजीपूर्वक वाचा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर खरेपणाने द्या. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर ‘होय’ असे असल्यास, तुमच्या जीवनात पाप आहे.

हे प्रश्न वाचताना तुम्हाला अपराधीपणाची जाणीव झाल्यास त्याचवेळी परमेश्वराचा स्वीकार करा. परमेश्वराबरोबर त्याच्या आज्ञेप्रमाणे राहाल तर तुमच्या जीवनातून पाप दूर होईल व तुम्हाला क्षमा प्राप्त होईल.

तुम्हाला तुमच्या पापांची कबुली परमेश्वरासमोर द्यायची आहे, हे तुम्ही लक्षात ठेवा. उदा. ‘‘हे प्रभू, माझ्या कार्यात मी तुला प्रथम स्थान दिले नाही. मी तुझी प्रार्थना व तुझे कार्य याकडे लक्ष दिले नाही. आपल्या पापांसाठी कोणत्याही प्रकारचे कारण सांगू नये, कारण त्यासाठी पूर्णत: तुम्हीच दोषी आहात.’’ नीती :

२८:१३ ‘‘जो आपले अपराध लपवून ठेवतो, त्याचे कार्य सफल होऊ शकत नाही. जो कोणी अपराध मान्य करतो व ते सोडून देण्याचा निश्चय करतो. त्याच्यावर दया केली जाईल.’’

दुसरे लोक काय म्हणतील याला काहीही महत्त्व नाही. त्याचप्रमाणे दुसरे, काय करतात किंवा काय नाही करत यालासुद्धा काहीही महत्त्व नाही. ख्रिस्ती व्यक्तिने आपल्याकडून कोणतीही गोष्ट अपूर्ण सोडू नये. एक महान जागृती निर्माण व्हावी म्हणून परमेश्वर त्याचे कार्य आपल्याकडून करुन घेतो. परमेश्वराने त्याच्या वचनाद्वारे व पवित्र आत्म्याच्या साहाय्याने जे दाखवतो, ते पूर्ण करण्यासाठी तो तुमच्याद्वारे सुरुवात करतो. परमेश्वराच्या उपस्थितीमुळे येणारा जागृतपणा आजपासूनच सुरु होऊ शकतो. यासाठी तुमची इच्छा असणे आवश्यक आहे. तर मग प्रथम वचन वाचा, प्रश्न विचारा आणि एक सत्यतेचे उत्तर द्या — ‘होय’ किंवा ‘नाही’ —

१. <u>**मत्तय ६:१२—१५**</u> : एखादी व्यक्ती अशी आहे का, की जिच्याबरोबर तुमची कटुता आहे ? अशी एखादी व्यक्ती आहे का, जिला तुम्ही क्षमा केली नाही? तुम्ही तिरस्कार करता, अशी एखादी व्यक्ती आहे का ? एखादा गैरसमज आहे का, जो तुम्ही विसरु इच्छित नाही ? तुमच्या मनात, एखाद्याच्या विरोधात कटुता, राग किंवा जळफळाट आहे का ? एखाद्याबद्दल तुम्ही चांगल्या गोष्टी ऐकू शकत नाही, अशी कोणी व्यक्ती आहे का ? तुमची वर्तणूक चुकीची असूनही, ती तुम्हाला योग्य वाटते का ?

२. <u>**मत्तय ६:३३**</u> : अशी एखादी बाब ज्यात तुम्ही परमेश्वराला प्रथम स्थान दिले नाही ? परमेश्वराच्या इच्छेचा विचार न करता केवळ आपली बुद्धिमत्ता व इच्छा याचा विचार करुन तुम्ही एखादा निर्णय घेतला आहे का ? अशी एखादी गोष्ट आहे का, की ज्यामुळे तुम्हाला परमेश्वराच्या सेवेत समर्पित होण्यासाठी अडथळा निर्माण होतो आहे ? उदा. उच्च — आशा आकांक्षा, मनाला प्रसन्न करणा—या किंवा मोहीत करणा—या काही बाबी, आपले इष्टमित्र, खोट्या मान्यता स्वीकारण्याची इच्छा असणे, तुमच्या स्वत:च्या योजना.

३. <u>**मार्क — १:१७**</u> : ख्रिस्तासाठी लोकांचा शोध घेण्यात तुम्हाला अपयश आले आहे का ? येशू ख्रिस्ताची साक्ष देण्यात तुम्ही अपयशी ठरले का ? तुम्हाला तुमच्या जीवनाद्वारे येशू ख्रिस्त दिसतो का ?

४. **<u>योहान — १३:३५</u>** : कोणावर आलेल्या संकटांना पाहून तुम्ही मनातल्या — मनात खूश होता का ?

एखाद्याची निपुणता व यश पाहून तुमच्या मनात जळफळाट होतो का ? एखादा संघर्ष किंवा भांडण यात तुम्ही दोषी आहात का ? एखाद्या वादविवादात तुम्ही भांडण करता का ? तुम्ही विभागणी किंवा चुकीच्या मौजमजा करणा—या आत्म्याचे भागीदार आहात का ? तुमच्या जीवनात असे लोक आहेत का; ज्यांची तुम्ही जाणूनबुजून उपेक्षा व तिरस्कार करता ?

५. **<u>मलाखी ३:१०</u>** : परमेश्वराने दिलेला वेळ, वरदान व पैसा यांची तुम्ही चोरी केली आहे का ? तुम्ही तुमच्या दशमांशमधून परमेश्वराच्या कार्यासाठी कमी दिले आहे का ? तुम्ही सुवार्तेच्या कार्यासाठी प्रार्थना करण्यात किंवा भेट देण्यात अपयशी ठरले आहात का ?

६. **<u>१ करिंथ ६:१२—२०</u>** : तुम्ही तुमच्या शरीराकडे लक्ष देत नाही का ? तुमचे शरीर पवित्र आत्म्याचे मंदिर समजून त्याची देखभाल करण्यात अपयशी ठरता का ? तुमच्यातील असंयमामुळे तुम्ही दोषी ठरवले जाता का ? तुमच्यात असा कोणता स्वभाव आहे, की त्यामुळे तुमचे शरीर दूषित होते ?

७. **<u>१ करिंथ ४:२</u>** : परमेश्वराचे कार्य करण्यासाठी तुम्ही एक जबाबदार व्यक्ती असल्याने तुमच्यावर भरवसा ठेवता येईल का ? तुम्ही परमेश्वराचे कार्य करण्यासाठी आपल्या भावनांना नियंत्रीत करता, की त्याच्यासाठी काहीच करत नाही ?

८. **<u>१ करिंथ १०:३१</u>** : तुम्हाला झालेला फायदा हा तुमच्यामुळे झाल्याचे तुम्ही मानता, की संपूर्ण महिमा परमेश्वराला देता ?
तुमच्या बोलण्यात 'मी' पणाचा उल्लेख जास्त येतो का ?
तुम्ही सहजतेने दुखावल्या जाता का ? तुम्ही जे मुळात नाही आहात, तेच बनण्याचा प्रयत्न करता का ?

९. **<u>इफिस ३:२०</u>** : तुम्ही स्वत:च्या बाबतीत जागरुक आहात का ? तुम्ही परमेश्वराच्या कार्यापासून स्वत:ला दूर ठेवता का ?

१०. **<u>इफिस ४:२८</u>** : तुम्ही लाच देता का ? तुम्ही तुमचे कार्य कमीत कमी परिणामाच्या पद्धतीने करता का ? कर्जाची परतफेड करण्यात कुचराई करता

का ? कर्ज परतफेड करता येऊ नये, यासाठी तुम्ही काही क्लुप्त्या करता का? तुम्ही दुस—यांच्या वेळेचा अपव्यय करता का ?

११. <u>**इफिस ३:२०**</u> : तुम्ही दुस—यांना दोष देता का ? तुम्ही दुस—यांच्या चुका काढता का ? एखादी व्यक्ती किंवा वस्तुबाबत तुमचा टिकात्मक दृष्टिकोन असतो का ? तुमचा स्वभाव चिडका आहे का ? तुम्ही तुमच्या मनात राग ठेवून चालता का ? तुम्हाला खूप राग येतो का ? तुम्ही दुस—यांच्या बाबतीत असंयमित होता का ? तुम्ही क्रुर व निर्दयी आहात का ?

१२. <u>**इफिस ५:२०**</u> : तुमचे चांगले होवो किंवा वाईट, परंतु तुम्ही परमेश्वरांचे आभार मानता की नाही ? तुम्ही वास्तविक स्वरुपात परमेश्वराच्या वचनावर विश्वास न ठेवता, त्याला खोटारडा म्हटले आहे का ? तुम्ही काळजी करता का ? तुमच्या अंतर्मनाचा ताबा, तुमच्या भावनांवर आधारित आहे का ? की परमेश्वराच्या वचनाच्या वास्तविकतेवर आधारित आहे ?

१३. <u>**इफिस ५:१६**</u> : रेडियो व टीव्ही वरील आपल्या जीवनाची कोणत्याही प्रकारे प्रगती न करणारे कार्यक्रम ऐकता का ? निम्नस्तरीय मासिकांचे वाचन तुम्ही करता का ? तुम्ही जगीक मनोरंजनात भाग घेता का ? येशू ख्रिस्तामध्ये तुम्ही संतुष्ट नाही, असे दर्शवणारे काही कार्य तुम्ही करता का ?

१४. <u>**फिलिप्पै १:२१**</u> : जीवनाच्या ओझ्याने तुम्ही दबून गेले आहात का ? प्रभू व त्याचे वचन सोडून तुमच्या मनात केवळ वस्तुंवर आधारित गोष्टींची आसक्ती असते का ? ख्रिस्तासाठी जगणे व त्याला आनंदी करणे, यापेक्षा दुसरी एखादी गोष्ट तुमच्या जीवनात महत्त्वपूर्ण आहे का ?

१५. <u>**फिलिप्पै २:१४**</u> : तुम्ही तुमच्या बोलण्याने किंवा कार्याने कोणाला दुःख पोहचवले आहे का ? तुम्ही गप्पा मारण्यात जास्त रस घेता का ? लोकांच्या माघारी तुम्ही निंदा करता का ? ख—या गोष्टींच्या विरोधात तुम्ही असता का? कारण ते दुस—या समुहाचे आहेत ? केवळ तुमचा व त्यांचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे, म्हणून तुम्ही त्यांना विरोध करता का ?

१६. <u>**फिलिप्पै ४:४**</u> : तुम्ही कोणत्याही प्रकारे त्याला अपमानीत केले आहे का ? तुम्ही त्याच्या योजनांपासून संतुष्ट आहात का ? परमेश्वराची आज्ञा पूर्णपणे न मानण्याची इच्छा तुमच्या मनात आहे का ? कोणतीही गोष्ट करणे किंवा न

करणे हे परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून असते, तुम्ही त्याच्या इच्छेचा अनादर करता का ?

१७. <u>**फिलिप्पै ४:४**</u> : तुम्ही कधी लाभप्रद नसलेल्या गोष्टींच्या मागे लागता का ? तुम्ही कधी खोटे बोलता का ? बढाई मारणा—या गोष्टी तुम्ही करता का ? धोका देता ? चोरी करता ? लक्षपूर्वक पहा..... तुम्ही जास्त किंमत घेता का?

१८. <u>**२ तीमथी २:२२**</u> : तुमच्या व्यक्तिगत सवयी वाईट आहेत का ? तुम्ही स्त्री असाल तर पुरुषांच्या बाबतीत व पुरुष असाल तर स्त्रीच्याबाबतीत वाईट विचार मनात बाळगता का ? वाईट व अपवित्र असलेले लिखाण वाचण्यात तुम्हाला रस आहे का ? मनोरंजनाच्या वाईट पद्धतीत तुम्ही सामील होता का? तुमच्या डोळ्यात लालच आहे का ?

१९. <u>**इब्री १०:२५**</u> : सुवार्ता प्रचाराच्या सभांपासून तुम्ही स्वत:ला दूर ठेवता का? तुम्ही कानगोष्टी करता का ? परमेश्वराच्या वचनाची चर्चा होत असताना तुम्ही अन्य बाबतीत काही विचार करता का ? विविध सभांना तुम्ही नियमित जाता का ? प्रार्थनासभेत भाग घेण्यासाठी तुम्ही नकार देता का ? तुमच्या व्यक्तिगत प्रार्थनेला तुम्ही नकार देता का ? तुम्ही परमेश्वराच्या वचनाचा तिटकारा करता का ? पवित्र शास्त्र व प्रार्थनेला तुम्ही मनोवेधक नाही समजत का ? तुमच्यासमोर वाढलेल्या अन्नासाठी परमेश्वराचे आभार मानता का ? दैनंदिन पारिवारीक प्रार्थनेला तुम्ही नकार देता का ?

२०. <u>**इब्री १०:२५**</u> : मंडळी व नेतृत्वाला तुम्ही समर्पित होता का ? तुम्ही आळशी व्यक्ती आहात का ? सुवार्ता प्रचारासंबंधी जे काही सांगितल्या जाते, त्याला तुम्ही विरोध करता का ? सुवार्ता मदतीला तुमचा विरोध आहे का ? तुम्ही जिद्दी स्वभावाचे आहात का ? शिक्षण प्राप्त करण्याची तुमची इच्छा नाही का ?

२१. <u>**याकोब १:२७**</u> : तुम्ही स्वत:ला 'चिन्हीत' करण्याची परवानगी दिली आहे का ? तुमचा पेहराव परमेश्वराला आवडतो का ? परमेश्वराला न आवडणा—या गोष्टींवर तुम्ही पैसा खर्च करता का ? तुम्ही खरेदी केलेल्या वस्तुंसाठी प्रार्थना करीत नाही का ?

२२. <u>**याकोब ४:६**</u> : ख्रिस्ती असल्याकारणाने तुमचा निर्वाह चांगल्या पद्धतीने होत आहे. अशी तुम्ही जाणीव करता का ? आपली स्वत:ची एक पद्धत

असावी यावर तुम्ही अडून बसता का ? तुम्ही आपल्या ‘अधिकारावर’ जास्त जोर देता का ?

२३. <u>**याकोब ४:११**</u> : तुम्ही परमेश्वराचा अनादर केला आहे का ? त्याच्या कार्यात अडथळा निर्माण केला आहे का ? त्याच्या सेवकावर टीका करता का? पालकवर्ग किंवा आत्मिक नेतृत्वासाठी प्रार्थना करण्यात असफल ठरला आहात का ? आपल्यात सुधारणा व्हावी हे स्वीकारण्यास तुम्हाला अडचण जाते का ? तुम्ही नेहमी परमेश्वराला काय आवडते, यापेक्षा लोक काय विचार करतात याबाबत चिंता करता का ?

आपल्या पापाला नष्ट करण्यात तुम्ही इमानदार व खरे ठरलात, तर परमेश्वराकडून तुम्ही शुद्ध होण्यास तयार राहा. ज्याने पापांची कबुली दिली त्याचाच स्वीकार केल्या जातो.

**खालील तीन गोष्टी लक्षात ठेवा —**

१. तुम्ही परमेश्वराच्या विरोधात असाल तर त्याच्याबरोबर आपले संबंधत सुधारुन, त्याचे कार्य करीत राहा.
२. तुम्ही एखाद्या व्यक्तिच्या विरोधात असाल, तर परमेश्वराला याची कबुली द्या, त्यानंतर त्या व्यक्तिबरोबर आपले संबंध सुधारा.
३. तुम्ही एखाद्या समुहाच्या विरोधात असाल तर परमेश्वराकडे याची कबुली द्या, त्यानंतर त्या समुहाबरोबर आपले संबंध सुधारा.

आपल्या चुकांची पूर्णपणे कबुली दिल्यास, पूर्णपणे शुद्धीकरण होईल. परमेश्वराचा आनंद जरुर येईल, त्यानंतर पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने साक्ष व प्रार्थना होईल, त्यानंतर जागृतीपणा निर्माण होईल.

स्तोत्र. १९:१२ — ‘स्वत:च्या चुका कोणाला समजतात ? गुप्त दोषांपासून तू मला शुद्ध ठेव.’

# BASIC INSTITUTE REQUEST FORM

तुम्हाला यापुढील शिक्षण इंग्रजी भाषेत पाहिजे असल्यास
आमच्याबरोबर संपर्क स्थापीत करा.

**NAME** ___________________________________

**ADDRESS** _______________________________________

**CITY** ____________ **STATE** ____________ **ZIP** _________

**COUNTRY** ____________________

**HOME PHONE** ______________ **I would like to train in English.**

**WORK PHONE**________________ **Please send me the BASIC Institute Catalog.**

**CELL PHONE**__________________

**BEEPER** ________________

**FAX** ____________________

**EMAIL** _____________________

**I have a prayer request. (Please put on back)**

**Mail To :**
**BASIC Institute**
**P.O. Box 431**
**Kiln, MS 39556 U.S.A.**
**Or Phone (228) 255-9251 / Fax (228) 255-8927**
**Email basic@basicministries.com**
**Web page www.basicministries.com**

या अभ्यासाद्वारे तुम्ही आशीर्वादीत झाले असाल, तर या अभ्यासपुस्तिकेच्या प्रतिलिपी अन्य लोकांना द्या.

प्रकाशकाद्वारे थेट प्राप्त करू शकता. तुम्हाला कोणत्या भाषेत पाहिजे ते आम्हाला इंग्रजीत कळवा.

**WRITE TO :**

**BROTHERS & SISTERS IN CHRIST**
**P.O. BOX 431**
**KILN, MS 39556**
**U.S.A.**

**Phone (228) 255-9251**

**Fax (228) 255-8927**

**Copies are available by Email**
**Send your request to** basic@basicministries.com
**Or**
**Visit our web site**
www.basicministries.com

**COPIES ARE AVAILABLE IN OTHER LANGUAGES.**
**CONTACT US FOR MORE INFORMATION.**

येशूविषयीची माहिति अन्य लोकांना अधिक चांगल्या पद्धतीने द्यावी, यासाठी उत्तम जीवन मिळावे, अशी तुमची इच्छा आहे का ?

तुम्ही एक समर्थ साक्षीदार बनण्याची इच्छा बाळगता का ?

तुम्ही जेव्हा सुवार्ता सांगता, तेव्हा जीवनाला एका सत्यतेत बदलताना पाहण्याची इच्छा बाळगता का ?

सुवार्ता प्रसाराचे सिद्धान्त जाणून घेण्याची तुमची इच्छा आहे का ?

तुम्ही पाच प्रकारचा प्रचार आणि त्याचे उद्देश हे जाणून घेण्याची इच्छा बाळगता का ?

तर हे पुस्तक तुमच्यासाठीच आहे.

बंधू हेनरी पल्सीफर द्वारा संकलित
आणि
पॉला मिंगुची द्वारा रेखाटलेली चित्रे

तुम्हाला सफल व विजयी जीवन जगण्यासाठी साहय होण्याकरिता अभ्यास साखळीची ही प्रथम रचना आहे. बंधू हेनरी पन्नासपेक्षा अधिक वर्षापर्यंत येशूकरिता जगले, त्यामुळे त्यांनी विजयाचा अनुभव घेतला. येशूचा क्रुस घेऊन चालल्यामुळे त्यांना कॅन्सरपासून मुक्ती मिळाली. आरोग्य प्राप्त झाल्यावर त्यांनी संपूर्ण जगाची यात्रा केली. या यात्रेदरम्यान, येशूसाठी जगल्याने विजय आणि सफलता कशाप्रकारे प्राप्त होते, हे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे परमेश्वराचा उद्देश त्यांच्या जीवनात कसा पूर्ण होईल हे शिकवले.

पवित्र शास्त्रातील मूळ सिद्धान्त समजून त्याप्रमाणे जीवन जगण्यास लोकांना साहाय्य व्हावे, यासाठी त्यांनी आपल्या अनुभवांवर आधारित लेखांचे संकलन केले आहे. यामुळे लोकांना सफल जीवन प्राप्त होऊ शकेल. पारिवारीक जीवनासाठी परमेश्वराचे सिद्धान्त समजण्यास साहाय्यक व्हावे, यासाठी या

विशेष अभ्यासाची रचना केली आहे. या अभ्यासाद्वारे तुमच्या व्यक्तिगत जीवनात धार्मिकता येऊ शकते व प्रत्येक दिवस येशूसाठी जगल्याने तुम्हाला जीवनात सफलता प्राप्त होईल. या अभ्यासाचा उपयोग करून तुम्ही अन्य लोकांना पारिवारीक जीवन संबंधी शिकवू शकता.

**प्रतिलिपीचे सर्वाधिकार १९९० सर्व हक्क सुरक्षित**

**या अभ्यासाचा कोणताही भाग प्रकाशकाच्या परवानगीशिवाय पुनर्मुद्रित करू नये. मर्यादित भाग छापल्यास ते मोफत वाटावे.**

## PUBLISHED BY :

**BROTHERS & SISTERS IN CHRIST**

**P.O. Box 431**

**Kiln, MS 39556**

**USA**

**Phone (228) 255-9251**

**Fax (228) 255-8927**

**Email basic@basicministries.com**

On the web at www.basicministries.com